cmyk

## संपादकीय

### विकृतीच्या सावटाखाली समाजव्यवस्था

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे घडलेली चार वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवरील बलात्कार आणि निर्घृण हत्येची घटना संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणारी ठरली आहे. समाजाच्या संवेदनशीलतेला आणि मानवतेलाच काळिमा फासणाऱ्या या घटनेने केवळ संताप व्यक्त करण्यापुरती मर्यादा राहिलेली नाही, तर संपूर्ण न्यायव्यवस्था, कायदा–सुव्यवस्था आणि सामाजिक मानसिकतेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४९ | शुक्रवार दि.८ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# ऊस उत्पादकांना दिलासा; इथेनॉल दर सुधारणार

## एफआरपी वाढीनंतर इथेनॉल आणि साखर धोरणात बदलांचे संकेत

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**उसाच्या एफआरपी मध्ये वाढ झाल्यानंतर आता कृषी मूल्य आणि किंमत आयोगाने ऊस–आधारित इथेनॉलच्या किमतीत वाढ करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे केली आहे. यासोबतच देशांतर्गत वापर आणि औद्योगिक–व्यावसायिक वापरासाठी साखरेचे वेगवेगळे दर निश्चित करण्याच्या दुहेरी किंमत धोरणाचाही विचार करण्याची सूचना आयोगाने केली आहे.**




केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतेच २०२६–२७ हंगामासाठी उसाच्या एफआरपीमध्ये प्रतिटन १०० रुपयांची वाढ करून ती ३,६५० रुपये प्रतिटन इतकी निश्चित केली आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने ऊस–आधारित इथेनॉलच्या दरातही सुधारणा करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. आयोगाच्या अहवालानुसार, सरकारकडून निश्चित करण्यात आलेली इथेनॉल दर प्रणाली आणि इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांकडून केली जाणारी हमीपूर्ण खरेदी यामुळे साखर उद्योगाला मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. परिणामी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाची बिले वेळेवर मिळण्यास मदत झाली आहे. गेल्या पाच वर्षांत उसाच्या एफआरपीसोबत धान्याधारित इथेनॉलच्या दरातही लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र उसाचा रस, साखर, साखर सिरप आणि बी–हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलच्या किमतीत तुलनेने ◀◀ पान २ वर

# प.बंगाल विधानसभा बरखास्त; ममता बॅनर्जींचे मुख्यमंत्रिपद संपुष्टात

## दिदीचा राजिनामा नाही मात्र राज्यपालांचा मोठा निर्णय



**कोलकाता । वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या राजकारणात गुरूवारी एका मोठ्या सत्तांतराची अधिकृत नोंद झाली आहे. विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येताच राज्यपालांनी संपूर्ण मंत्रिमंडळ बरखास्त केल्याने ममता बॅनर्जी यांचे मुख्यमंत्रिपद आता संपुष्टात आले आहे. राजीनाम्यावरून सुरू असलेल्या राजकीय ओढाताणीच्या पार्श्वभूमीवर, थेट घटनात्मक प्रक्रियेद्वारे हा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे बंगालमधील १५ वर्षांच्या जुन्या सत्ताकाळाचा एक अध्याय अचानक समाप्त झाला आहे.

२०२६ च्या विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी मोठे पाऊल उचलले आहे. त्यांनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४ (२) मधील उप–कलम (ख) ◀◀ पान २ वर

# ३१० कोटींच्या अपहार प्रकरणात बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या ३१० कोटी रुपयांच्या आर्थिक अपहार प्रकरणाच्या तपासात बीड पोलिसांनी गुरूवारी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील तांत्रिक आणि दस्तऐवजी पुराव्यांच्या आधारे बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले



आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र. नं.५४४/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात एकूण ३१० कोटी रुपयांचा अपहार झाला असून, आतापर्यंत ७३ कोटी रुपयांच्या रकमेचे वाटप झाल्याचे तपासात समोर आले आहे. विशेष तपास पथकामार्फत या गुन्ह्याचा तपास सुरू आहे. आतापर्यंत या प्रकरणात एकूण १० आरोपींचा समावेश असून, त्यापैकी ३ आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, व्हिडिओ, ऑडिओ रेकॉर्डिंग आणि महत्त्वाची नोंदवही तसेच रजिस्टर जप्त केले आहेत. अटक करण्यात आलेल्या इतर आरोपींच्या मोबाईलमधील कॉल डिटेल्स आणि रेकॉर्डिंगचे तांत्रिक विश्लेषण तसेच हस्तलिखित व स्वाक्षरी नमुन्यांचे तज्ज्ञांकडून ◀◀ पान २ वर

# विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करा

## शैक्षणिक नुकसान खपवून घेणार नाही,चंद्रकांत पाटील यांचे आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. विद्यार्थ्यांची फसवणूक आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान मुळीच खपवून घेतले जाणार नाही. विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करा, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी प्रशासनाला दिले.



चंद्रकांत पाटील यांनी वांद्रे, मुंबई येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या फसवणूक प्रकरणाची गंभीर दखल घेत दोषी संस्थांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले. वांद्रे येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयात १३२ हून अधिक विद्यार्थ्यांना बोगस अभ्यासक्रम आणि पदव्या देऊन फसविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाचा सविस्तर आढावा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला. यावेळी सदर मान्यताप्राप्त वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता नसलेला अभ्यासक्रम सुरू करुन विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याबद्दल या संस्थेच्या ◀◀ पान २ वर

# देशभरात 'कोश्यारी' नेमून लोकशाहीची गळचेपी

## प.बंगाल, तामीळनाडूतील परिस्थीवरून संजय राऊत यांची भाजपावर टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

पश्चिम बंगालमध्ये घटनात्मक पेच निर्माण होईल का या विषयी मी आताच सांगू शकत नाही. पण राज्यपाल आणि देशाचे गृहमंत्री कोणत्याही थराला जाऊ शकतात. ममता बॅनर्जी यांची भूमिका स्पष्ट आहे की मी निवडणूक हरले नाही. कपट रचून माझा पराभव घडवण्यात आला, १०० जागा लुटल्या गेल्या, ९० लाख मते कापली गेली. त्यातील २७ लाख मतांचा विषय कोर्टात प्रलंबित आहे. याच मताचे अंतर बॅनर्जी आणि भाजपमध्ये आहे.




ममता बॅनर्जी या फार मोठे आंदोलन करणाऱ्या नेत्या आहेत. सत्तेवर असताना–नसताना त्यांनी आंदोलने केली आहेत. बंगालमध्ये हिंसाचार उसळला असून, आतापर्यंत ७ जणांचा बळी गेला आहे. अनेक ठिकाणी आग लागली आहे. भाजपने देशभरात कोश्यारी नेमले आहेत, असे म्हणत राऊतांनी तामिळनाडूच्या राज्यपालांवर टीका केली.

संजय राऊत म्हणाले की, ट्रम्प यांनी धमकी दिल्याने 'ऑपरेशन सिंदूर' थांबवले, आमच्या सत्ताधाऱ्यांनी इराणकडून काही धडे घेतले पाहिजेत. ◀◀ पान २ वर

# आज दहावीचा निकाल

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडून घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल ८ मे रोजी जाहीर होणार आहे. राज्यातील लाखो विद्यार्थी आणि पालकांची प्रतीक्षा अखेर संपणार असून दुपारी १ वाजता निकाल ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबरच वेगवेगळी सांख्यिकी



माहिती उपलब्ध होईल.

फेब्रुवारी–मार्च २०२६ दरम्यान राज्यभरात दहावीची परीक्षा घेण्यात आली होती. निकालासंदर्भात सकाळी ११ वाजता राज्य मंडळाच्या ◀◀ पान २ वर

# सोहराबुद्दीन बनावट चकमक प्रकरणात २२ आरोपींची निर्दोष सुटका

**मुंबई । प्रतिनिधी**

सोहराबुद्दीन शेख, त्याची पत्नी कौसर बी आणि सहकारी तुलसीराम प्रजापती यांच्या कथित बनावट चकमक प्रकरणी २१ पोलीस कर्मचाऱ्यांसह सर्व २२ आरोपींची निर्दोष सुटका करण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. मुख्य न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती गौतम अंखद यांच्या खंडपीठाने या निकालाला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळून लावल्या.



सोहराबुद्दीन शेखचे भाऊ रुबाबउद्दीन आणि नायबउद्दीन यांनी विशेष सीबीआय न्यायालयाने २०१८ मध्ये दिलेल्या निकालाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. बार अँड बेंचच्या वृत्तानुसार, या याचिका फेटाळताना खंडपीठाने सांगितले की, पुराव्याअभावी आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय योग्य आहे. सोहराबुद्दीन शेख यांच्या भावांनी ट्रायल कोर्टाचा निकाल रद्द करण्याची किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३८६(अ) अंतर्गत या प्रकरणाची फेरचाचणी घेण्याची मागणी केली होती. हा खटला मूलभूतपणे सदोष असून न्यायाचा पराभव होईल अशा पद्धतीने चालवला गेला, असा आरोप ◀◀ पान २ वर

# पशुसंवर्धन विभागात अधिकारी पदासाठी मोठी भरती !

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांच्या भरतीबाबत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्वाना खुशखबर दिली आहे. राज्यात पशुधन विकास अधिकारी पदाच्या २ हजार ७९५ तर सहाय्यक आयुक्त पदाच्या ३०८ जागा भरण्याची प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सुरू केली असून, तशी जाहिरात प्रसिद्ध केली आहे.**

पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवांवर पडणारा ताण कमी करण्यासाठी या पदांच्या भरती प्रक्रियेला गती



देण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट 'अ'च्या २ हजार ७९५ आणि सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन गट 'अ'च्या ३०८ पदांसाठी संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ही परीक्षा ११ जून २०२६ रोजी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केले असून, संबंधित ◀◀ पान २ वर

### भरतीमुळे कामांना गती येईल – पंकजा मुंडे

या निर्णयाबाबत आनंद व्यक्त करताना पशुसंवर्धन मंत्री मुंडे म्हणाल्या की, खूप दिवस झाले आपण ज्या अत्यंत आनंदाच्या बातमीची प्रतीक्षा करत आहात, ती बातमी तुम्हा सर्वांना देण्यासाठी मला आनंद होत आहे. एवढे सर्व अधिकारी पशुसंवर्धन खात्यात रुजू झाल्यानंतर विभागाच्या कामाला मोठा वेग मिळेल. ग्रामीण भागातील लोकांच्या आणि त्यांच्या पशुधनाची अधिक चांगली काळजी घेणे शक्य होईल.''या भरतीमुळे राज्यातील पशुवैद्यकीय यंत्रणेला मोठे बळ मिळणार असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करून या परीक्षेला बसणाऱ्या सर्व परीक्षार्थींना मुंडे यांनी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.



# जालन्यात नशाच्या गोळ्या व इंजेक्शन जप्त

**जालन । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे सदर बाजार चे डी बी पथकाचे पोउपनि श्री. सचिन सानप हे व स्टाप पोलीस ठाणे येथे हजर असताना त्यांना गोपनिय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, गांधीनगर कडे जाणारे रोडवरील संजरी सप्लीमेंट गोडावून येथे एक इसम नशे साठी वापरण्यात येणारे गुंगीकारक इंजेक्शन च्या बाटल्या व नशेच्या गोळयांची अवैधरित्या विक्री करत असले बाबत खात्रीलायक माहिती मिळाल्याने त्यांनी सदर ची माहिती पोनि श्री. संदीप भारती यांना सांगून त्यांचे ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### ना.शिंदे यांच्या हेलिकॉप्टरला वादळाचा तडाखा

ठाणे: एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर गुरुवारी दुपारी खराब हवामानामुळे वादळी वाऱ्यांच्या तडाख्यात सापडल्याने काही काळ मोठी खळबळ उडाली. मात्र, वैमानिकाच्या कौशल्यपूर्ण निर्णयामुळे हेलिकॉप्टर सुरक्षितपणे जुहू विमानतळावर उतरवण्यात आले आणि मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर राजकीय वर्तुळासह शिंदे समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. शिंदे हे गुरुवारी दुपारी कल्याण–मुरबाड परिसरातील विविध कार्यक्रमांसाठी रवाना झाले होते. मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथील हेलिपॅडवरून त्यांच्या हेलिकॉप्टरने उड्डाण केले. सुरुवातीला हवामान सामान्य असल्याने प्रवास सुरळीत सुरू होता. हेलिकॉप्टर कल्याण परिसरात पोहोचताच अचानक हवामानाने रौद्र रूप धारण केले. जोरदार वादळी वारे आणि ढगांच्या हालचालीमुळे हेलिकॉप्टर हादरू लागले. काही काळ हेलिकॉप्टर अस्थिर झाल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले. वादळाचा वेग इतका तीव्र होता की हेलिकॉप्टर नियंत्रित ठेवणे हे मोठे आव्हान बनले होते. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच वैमानिकाने तातडीने निर्णय घेत हेलिकॉप्टर सुरक्षित मार्गाने मुंबईच्या दिशेने वळवले.

### नवीन कामगार नियमावलीचा मसुदा प्रसिद्ध

मुंबई: राज्यातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांचे हित, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारने १ नोव्हेंबर २०२५ रोजी लागू केलेल्या नवीन चार कामगार संहितांच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्याची नियमावली तयार केली असून त्याचा मसुदा नुकताच प्रसिद्ध केला आहे. या प्रस्तावित नियमावलीवर राज्यातील सर्व संबंधित घटकांनी आपल्या हरकती आणि सूचना अधीसूचना प्रसिद्ध झाल्याच्या ४५ दिवसांच्या आत नोंदवाव्यात, असे आवाहन राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले. केंद्र शासनाने औद्योगिक संबंध, वेतन संहिता, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थळ परिस्थिती संहिता २०२०, तसेच सामाजिक सुरक्षा संहिता २०२० अशा चार प्रमुख संहिता देशभर लागू केल्या आहेत. या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी राज्याला स्वत:ची नियमावली तयार करणे आवश्यक होते.

### संजय कपूर मालमत्ता वादात माजी सरन्यायाधीश मध्यस्थ

नवी दिल्ली: दिवंगत उद्योगपती संजय कपूर यांच्या वारसा हक्कावरून कुटुंबियांमध्ये सुरू असलेल्या तीव्र वादावर पडदा टाकण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी (दि. ७ मे) महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. दोन्ही बाजूंनी सामोपचाराने तोडगा काढण्याची तयारी दर्शवल्यामुळे, न्यायालयाने भारताचे माजी सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांची मध्यस्थ म्हणून नियुक्ती केली आहे. संजय कपूर यांच्या संपत्तीवरून राणी कपूर आणि प्रिया कपूर (संजय कपूर यांची पत्नी) यांच्यात कायदेशीर लढाई सुरू आहे. राणी कपूर फॅमिली ट्रस्टची निर्मिती आणि त्यावरील नियंत्रण यावरून हा मुख्य वाद आहे. राणी कपूर यांचा आरोप आहे की, हा ट्रस्ट फसवणुकीने तयार करण्यात आला असून, त्याद्वारे त्यांना सोना ग्रुपच्या कंपन्यांच्या मालकीहक्कापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ मे २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २२१.५० क्विंटल | २,१२५ | २,६०० | २,३१५ |
| ज्वारी/हायब्रिड: १४९.०० क्विंटल | १,८०१ | ३,८५१ | २,३०० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १२६.५० क्विंटल | १,८३२ | २,५६२ | २,२४१ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

## अग्रलेख

# विकृतीच्या सावटाखाली समाजव्यवस्था

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे घडलेली चार वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवरील बलात्कार आणि निर्घृण हत्येची घटना संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणारी ठरली आहे. समाजाच्या संवेदनशीलतेला आणि मानवतेलाच काळिमा फासणाऱ्या या घटनेने केवळ संताप व्यक्त करण्यापुरती मर्यादा राहिलेली नाही, तर संपूर्ण न्यायव्यवस्था, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक मानसिकतेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. विशेष म्हणजे या अमानुष कृत्याचा आरोपी हा ६५ वर्षांचा वृद्ध असून यापूर्वीही अशाच स्वरूपाच्या गुन्ह्यात शिक्षा भोगलेला आहे. पॅरोलवर सुटल्यानंतर पुन्हा त्याने अशाच प्रकारचा गुन्हा केल्याने समाजातील विकृत मानसिकतेची भीषणता अधिक स्पष्ट झाली आहे.

या घटनेनंतर राज्यभरातून संतापाची लाट उसळली. रस्त्यावर उतरलेले नागरिक, महिलांचे मोर्चे, युवकांचे रास्ता रोको आंदोलन आणि सोशल मीडियावरील संतप्त प्रतिक्रिया या केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून त्या समाजातील भीती आणि असुरक्षिततेचे प्रकटीकरण आहे. पालकांच्या मनात आज आपल्या मुलींच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेली चिंता अत्यंत गंभीर आहे. कारण अशा घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत; त्या वारंवार घडत आहेत आणि प्रत्येक वेळी समाजाच्या जखमा अधिक खोल करत आहेत. नसरापूर प्रकरणाची चर्चा सुरू असतानाच चाकण येथे तीन वर्षीय मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याचा खून झाल्याची घटना समोर आली. त्याचवेळी विदर्भात एका ७५ वर्षीय वृद्धेवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटना स्वतंत्र नाहीत; त्या समाजातील वाढत्या नैतिक अध:पतनाचे आणि विकृत मानसिकतेच्या प्रसाराचे संकेत आहेत. वय, नाते, लिंग किंवा परिस्थिती यांचे कोणतेही भान न ठेवता केवळ पशुतुल्य वासनेतून गुन्हे घडत आहेत, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

अशा घटनांनंतर नेहमीप्रमाणे सरकारवर, गृहखात्यावर आणि पोलिसांवर टीकेची झोड उठते. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की गुन्हा घडू नये यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची भूमिका तितकीच महत्त्वाची असते. पोलिसांचे प्राथमिक कर्तव्य म्हणजे गुन्ह्याचा जलद तपास, पुरावे गोळा करणे आणि आरोपीला न्यायालयात शिक्षा होईल अशी सक्षम केस उभी करणे. परंतु प्रश्न इतक्यावर संपत नाही. गुन्हेगाराला शिक्षा होण्यासाठी अनेक वर्षे लागली तर त्या शिक्षेची भीती समाजात उरत नाही. परिणामी संभाव्य गुन्हेगारांवर कोणतीही मानसिक जरब राहत नाही. भारतीय न्यायव्यवस्थेतील विलंब ही आजची सर्वात मोठी समस्या ठरत आहे. प्रत्येक भीषण घटनेनंतर ''फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवू'', ''लवकरात लवकर फाशी देऊ'' अशा घोषणा केल्या जातात; पण प्रत्यक्षात अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. दिल्लीतील चर्चित श्रद्धा वालकर हत्याकांड असो किंवा देशभरातील इतर बलात्कार-हत्येची प्रकरणे, त्यांतील अनेक आरोपी अजूनही अंतिम शिक्षेच्या प्रतीक्षेत आहेत. न्याय मिळण्यात होणारा विलंब हा पीडित कुटुंबासाठी दुसरा मानसिक छळच ठरतो. ''उशिरा मिळालेला न्याय हा अन्याय असतो'' ही उक्ती अशा घटनांमध्ये अधिक प्रकर्षाने जाणवते. राज्य सरकारने या प्रकरणात वेगवान तपास करून लवकरात लवकर आरोपपत्र दाखल करणे अत्यंत आवश्यक आहे. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातच काही गंभीर प्रकरणांमध्ये अवघ्या ४८ तासांत आरोपपत्र दाखल करून पोलिसांनी कार्यक्षमतेचे उदाहरण निर्माण केले होते. तशाच प्रकारची तत्परता या प्रकरणातही दिसणे अपेक्षित आहे. कारण कायद्यावरील लोकांचा विश्वास टिकवून ठेवणे हे कोणत्याही लोकशाही सरकारचे सर्वात मोठे कर्तव्य असते.

या प्रकरणातील आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे अशा गंभीर गुन्ह्यात शिक्षा भोगणाऱ्या आरोपीला पॅरोल कसा मंजूर झाला? बलात्कारासारख्या विकृत गुन्ह्यात दोषी ठरलेले अनेक गुन्हेगार बाहेर आल्यानंतर पुन्हा त्याच प्रकारचे अपराध करतात, हे अनेक घटनांमधून सिद्ध झाले आहे. त्यामुळे पॅरोल मंजुरीची प्रक्रिया, त्यामागील निकष आणि देखरेख यांचा फेरआढावा घेणे अत्यावश्यक बनले आहे. केवळ गुन्हेगारालाच दोष देऊन चालणार नाही; तर अशा गुन्हेगारांना बाहेर येण्याची संधी देणाऱ्या व्यवस्थेची जबाबदारीही निश्चित झाली पाहिजे. गेल्या वर्षी बदलापूर येथे घडलेल्या घटनेनंतर आरोपीचा एन्काउंटर करण्यात आला होता. त्यामुळे आता नसरापूर प्रकरणातही आरोपीचा एन्काउंटर करण्याची मागणी जोर धरत आहे. ही मागणी कायदेशीरदृष्ट्या किती योग्य-अयोग्य यावर मतभेद असू शकतात; परंतु समाजातील संतापाची तीव्रता मात्र त्यातून स्पष्ट होते. जेव्हा न्याय मिळण्याची प्रक्रिया संथ वाटू लागते, तेव्हा लोकांचा कल तात्काळ आणि कठोर शिक्षेकडे झुकतो. ही स्थिती लोकशाही व्यवस्थेसाठी धोकादायक संकेत मानावी लागेल. या घटनांचा विचार केवळ कायदा आणि सुव्यवस्थेच्या चौकटीत करून चालणार नाही. समाजातील वाढती अश्लीलता, डिजिटल माध्यमांमधून होणारा विकृत मजकुराचा प्रसार, कुटुंबव्यवस्थेतील ढासळलेली संवादसंस्कृती, महिलांकडे पाहण्याचा विकृत दृष्टिकोन आणि नैतिक शिक्षणाचा अभाव या सर्व घटकांचा गंभीरपणे विचार करावा लागेल. मुलांमध्ये आणि युवकांमध्ये स्त्री-सन्मान, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे ही तितकीच महत्त्वाची गरज आहे. महिला आणि बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी केवळ कठोर कायदे पुरेसे नसतात; त्यांची कठोर आणि तातडीने अंमलबजावणी होणे अधिक आवश्यक असते. पोलिस दलाचे आधुनिकीकरण, जलद न्यायनिवाडा, मानसोपचारतज्ज्ञांची मदत, गुन्हेगारांच्या मानसिकतेचा अभ्यास आणि पुनर्वसन यंत्रणा यावरही सरकारने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

नसरापूरसारख्या घटना केवळ एखाद्या गावाची किंवा जिल्ह्याची समस्या नसून त्या संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेची परीक्षा आहेत. निष्पाप बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा कोणत्याही राजकारणापेक्षा मोठा आहे. त्यामुळे सरकार, न्यायव्यवस्था, पोलीस यंत्रणा आणि समाज या सर्वांनी एकत्रितपणे कठोर आणि परिणामकारक भूमिका घेतली नाही, तर अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील.

समाजात भीती नव्हे तर सुरक्षिततेची भावना निर्माण करायची असेल, तर अशा नराधमांना तातडीने आणि कठोर शिक्षा होणे अत्यावश्यक आहे. कारण विकृतीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कायद्याचा धाक आणि न्यायव्यवस्थेची गती या दोन्ही गोष्टी तितक्याच प्रभावी असणे गरजेचे आहे.

---

# व्यसनधीनता एक गंभीर मानसिक आजार-मानसोपचार तज्ज्ञ डॉ.जगदीश टेकाळे

## दारु पिणे,सिगारेट ओढणे, चरस,गांजा,नशेच्या गोळ्यांचे सेवन ही मनोविकारांची लक्षणे वेळीच,योग्य उपचाराने ९५% रुग्ण होतात बरे, अन्यथा भयंकर दुष्परिणाम

बीड । प्रतिनिधी

वाढती व्यसनाधीनता हे वाढत्या गुन्हेगारीचे एक प्रमुख कारण बनले आहे. मात्र, दारू पिणे, सिगारेट ओढणे, चरस, गांजा, नशेच्या गोळ्यांचे सेवन हे मनोविकार आहे, हे लोकांना माहीतच नाही. त्यामुळे नशा करणारे व्यक्ती हळूहळू या मादक पदार्थांच्या आहारी जाऊन व्यसनाधीन बनतात. त्यातून अनेक जण हिंसक होऊन जीवघेणा हल्ला, खून हे असे अनेक समाजघातक कृत्ये घडतात. तर वेळीच आणि योग्य उपचाराने ९५ टक्के रुग्ण बरे होऊन मानसिक आणि सामाजिक स्वास्थही सुदृढ होते.

**वाईट सवय म्हणून वाऱ्यावर सोडू नका !**

व्यसनाधीनता हे मानसिक आजार असल्याने वेळीच, योग्य औषधोपचाराने बराही होऊ शकतो. त्यामुळे त्याला वाईट सवय लागली, तो वाया गेला. असे समजून त्याला वाऱ्यावर न सोडता नशेखोरीच्या या संकटातून सावरण्याची संधी आणि आधार द्या. यासाठी मानसोपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन डॉ.टेकाळे यांनी केले.

**दारू पिणे, सिगारेट ओढणे हे मानसिक आजार आहेत ?**

होय, तंबाखूसह बिडी, सिगारेट, बियर, दारू, गांजा, भांग, अफू या नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन हे मानसिक आजाराच आहेत. नशेच्या गोळ्या घेणे हे सुद्धा एक घातक मनोविकार अनेकांना जडला आहे. झिंग येण्यासाठी इतरही अनेक घटक, पदार्थांचा सर्रास वापर होतो. वेळीच, योग्य औषधोपचाराने हे रोखता येते.



**व्यसनांची सवय लागते कशी ?**

सुरुवातीला केवळ मौजमजा, जिज्ञासा किंवा फक्त टेन्शन आले म्हणून अमली पदार्थांची चव चाखणारे नंतर हळूहळू या गर्तेत आपोआपच अडकतात. स्पर्धेचे युग, कामांचा ताण, बिघडलेली जीवनशैली यामुळेही नशेखोरीत गुरफटले जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यात मग झोपडपट्टीपासून ते उच्चभ्रू लोकही आहेत. अनेक तरुण कधी मित्रांच्या आग्रहापोटी तर, काही वेळा अभ्यास करताना झोप येऊ नये म्हणून विद्यार्थी अमली पदार्थांचे सेवन करतात. हे प्रमाण आता वाढत चालले आहे.

**व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम कोणते ?**

व्यसनाधीनताही गंभीर समस्या असून याचे अनेक दुष्परिणामही आहेत. मादक पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते. त्यातून दुखणे, कुटुंब कलह, घटस्फोट त्यापुढे समाज घातक कृत्ये नशेखोरीतून घडतात. याचे अनेक उदाहरणे आहेत. व्यसनाधीन व्यक्तीने जीवघेणा हल्ला, खून केल्याच्या अनेक घटना रोजच्याच झाल्या आहेत.

**तरुणवर्ग व्यसनांमध्ये गुरफटतोय ?**

भावनिक चलबिचलता आणि जीवनात थ्रिल म्हणून किशोरवयीन मुलांमध्ये नशेखोरीचे प्रमाण वाढत आहे. अगदी शाळकरी मुलेसुद्धा आता सिगारेट, बियर, दारूचे सेवन करू लागले आहे. त्यापुढे गांजा, चरस, अफू, कोकिन, नशेच्या गोळ्यांची चटक बहुसंख्य युवापिढीला लागली आहे. तरुण मुलीही या विळख्यात अडकत असल्याने याकडे पालकांनी, समाजाने लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

**व्यसनांना नाही कसे म्हणायचे?**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यसनांच्या सवयी लागण्याआधीच नाही म्हणायचे. दुसरे म्हणजे व्यसनांपासून मुक्त झाल्यावर मनाचा ठाम निश्चय करा. मित्रांनी, कुणी आग्रह धरला तर सरळ आणि स्पष्ट शब्दांत नाही म्हणा. कुटुंबीयांसोबत वेळ घालवा. सतत कामांत व्यस्त आणि स्वस्थ रहा.

**नशेखोरीतून गुन्हेगारी फोफावते ?**

नशेच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे मानसिक व शारीरिक संतुलन बिघडते. नशा करण्यासाठी अमली पदार्थ मिळाले नाही की मग चिडचिड, हिंसकवृत्ती, नशा भागवण्यासाठी चोरी, गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावते. हे त्या व्यक्तीसाठी, कुटुंब आणि समाजासाठी अत्यंत घातक आहे.

**पालकांनी काय काळजी घ्यावी?**

पालकांनी मुलांकडे विशेष लक्ष द्यावे, ते इंटरनेटचा काय वापर करतात, मोबाईलवर काय बघतात, मित्र कोण आहेत. याची माहिती घेत राहावी, मुलांसोबत गप्पा माराव्या, त्यांना बोलते करावे. मैदानी खेळ खेळावे. गायन, वादन आणि वाचनासह आवडते छंद जोपासावे.

**औषधोपचाराने व्यसने सोडता येतात ?**

होय, व्यसन करणे हे मनोविकार असल्याने त्यानुसार आजार समजूनच शारीरिक व मानसिक औषधोपचार केले जातात.व्यसने सोडू शकतो, याचा विश्वास निर्माण करून आध्यात्मिक शिक्षणाच्या जोडीने प्रेमळ आणि सुरक्षित वातावरण दिले जाते. त्यांच्यातील कलागुण ओळखून त्यानुसार कामांमध्ये व्यस्त ठेवून व्यसनाशिवायही आनंदी जीवन जगता येते. हे मनावर ठामपणे बिंबवले जाते. सातत्याने काही दिवसांत व्यसनाधीन व्यक्ती व्यसनमुक्त होतो.

**मानसिक आजारांविषयी समज-गैरसमज ?**

होय, समाज प्रगत झाला तरी आजही मानसिक आजारांविषयी अनेक समज-गैरसमज आहेत. महत्वाचे म्हणजे व्यवसनाधीनता हे मानसिक आजार असल्याचे लोकांना माहीतच नाही. औषधोपचाराने दारु, सिगारेट,चरस , गांजा, नशेच्या गोळ्यांचे इतकेच नव्हे तर ऑनलाईन गेमिंग आणि सतत मोबाईलमध्ये गुंग असणारेही या जोखडातून सुटले नाही.

**व्यसनांना पहिल्यांदाच नाही म्हणा**

आज घडीला हजारो-लाखो तरुण नशेखोरीत गुरफटल्याने गुन्हेगारीच्या अनेक घटना घडत आहेत. याचे दुष्परिणाम भयंकर आहेत. व्यसनांमुळे शारीरिक,मानसिक,,आर्थिक आणि कौटुंबिक हानी होते. योग्य मार्गदर्शन आणि उपचाराने या विळख्यातून बाहेर पडता येते. परंतु पहिल्यांदाच व्यसनांना नाही म्हणणे हे त्याहून चांगले असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

---

# पान १ वरून...

**ऊस उत्पादकांना दिलासा;**

कमी वाढ झाली आहे. त्यामुळे एफआरपी वाढ लक्षात घेता ऊस-आधारित इथेनॉलचे दर वाढविणे गरजेचे असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. याशिवाय, साखरेसाठी दुहेरी किंमत प्रणाली लागू करण्याच्या शक्यतेचाही आयोगाने उल्लेख केला आहे. देशातील एकूण साखर उत्पादनापैकी सुमारे ६० ते ६५ टक्के साखरेचा वापर औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रात होत असल्याने घरगुती ग्राहक आणि उद्योगांसाठी स्वतंत्र दर ठरविण्याची मागणी विविध राज्य सरकारे, साखर उद्योग आणि व्यापारी संघटनांकडून करण्यात आली असल्याचे आयोगाने म्हटले आहे. दरम्यान, गेल्या दशकात भारतीय साखर उद्योगाने इथेनॉल उत्पादनाकडे मोठ्या प्रमाणावर वळत उत्पादन क्षमता वाढविल्याचेही आयोगाने नमूद केले आहे. ऊस लागवड क्षेत्र, कारखान्यांमधील किमान अंतर निकष, महसूल वाटप सूत्र आणि दुहेरी किंमत धोरण यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारे, उद्योग क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि शेतकरी प्रतिनिधींचा समावेश असलेली उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन करण्याची शिफारस आयोगाने केली आहे.

-----------

**३१० कोटींच्या अपहार प्रकरणात**

परीक्षण करण्यात आले आहे. या सर्व पुराव्यांच्या आधारे ७ मे २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपमहानिरीक्षक (नांदेड परिक्षेत्र) शहाजी उमाप आणि प्रभारी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये सहाय्यक पोलीस अधीक्षक (केज) व्यंकटराम यांचे पथक, स्थानिक गुन्हे शाखा बीड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने संयुक्तरीत्या सहभाग घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, यामध्ये आणखी काही मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.जिल्हाधिकारी पाठ यांच्या कायकाळात भुसंपदनाचा मोठा घोटाळा झाला होते. सुरूवातील वंचितचे जिल्हाध्यक्ष उध्दव खाडे यांनी या विरोधात आवाज उठवला होता पुढे अजय सरवदे यानी पाठपुरावा केला होता या प्रकरणाता ज्या वकीलाने तक्रार केली होती त्या वकीलास देखील सुरूवातीच्या काळात आरोपी करण्यात आले. मात्र घटनेचे गांभीर्य पाहता दैनिक राज्य लोकतंत्रने २०, २१ नोव्हेंबर व १३ डिसेंबर २०२५ रोजी या घोटाळ्याची मालिका प्रकाशित केली होती.

----------

**प.बंगाल विधानसभा बरखास्त;**

अन्वये प्राप्त असलेल्या विशेष अधिकारांचा वापर करून पश्चिम बंगाल विधानसभा भंग करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे नवीन सरकार स्थापनेच्या प्रक्रियेला आता अधिकृत गती मिळाली आहे. बुधवार, ६ मे २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या विशेष राजपत्र अधिसूचना नुसार ही घोषणा करण्यात आली आहे. संसदीय कार्य विभागाने दिलेल्या निर्देशांनुसार, ७ मे २०२६ पासून वर्तमान विधानसभा औपचारिकरीत्या बरखास्त मानली जाईल. मुख्य सचिव दुष्मंत नारियाला यांनी राज्यपालांच्या स्वाक्षरीने हा आदेश जनहितार्थ प्रकाशित केला आहे. निवडणुकीनंतर नवीन सरकार कार्यभार स्वीकारण्यापूर्वी जुनी विधानसभा विसर्जित करणे ही एक अनिवार्य घटनात्मक परंपरा आहे. राज्यपालांच्या या आदेशासह १७ व्या विधानसभेचा कार्यकाळ अधिकृतपणे संपुष्टात आला आहे. आता नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींच्या सहभागाने १८ व्या विधानसभेच्या स्थापनेचा मार्ग प्रशस्त झाला आहे. येत्या काही दिवसांत नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी आणि विधानसभेचे पहिले अधिवेशन बोलावण्याबाबतची प्रशासकीय प्रक्रिया सुरू होईल. बंगालच्या राजकीय क्षितिजावर आता नवीन नेतृत्वाच्या आगमनाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

-------------

**देशभरात 'कोश्यारी' नेमून**

केंद्र सरकारला वाटते की पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार घडला पाहिजे आणि त्याचे लोण देशभरात गेले पाहिजे. भाजपला देशभरात आग लावायची आहे, दोन वर्षांमध्ये सर्व देशात आग लागली की लोकसभा निवडणूक घ्यायची हा त्यांचा प्लॅन आहे. पंजाबमध्ये आजपर्यंत स्फोट झाले नाहीत. तिथे आता स्फोट झाला. पंजाबचे मुख्यमंत्री म्हणाले की, भाजपने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. स्फोट त्यांचे उदाहरण आहे. बंगालमधील हिंसाचारास केंद्र सरकार जबाबदार आहे. तामिळनाडूमध्ये परिस्थिती वेगळी आहे, तिथे राज्यपालांनी सर्वांत मोठ्या पक्षाला सत्तास्थापनेसाठी आमंत्रित केलेले नाही, असे सांगत राऊत यांनी भाजपावर निशाणा साधला.

**राज्यपाल भाजपचे एजंट - कपिल सिब्बल**

ज्येष्ठ विधिज्ञ आणि काँग्रेस नेते कपिल सिब्बल यांनी ट्विट करुन, पत्रकार परिषद घेत तामिळनाडूतील सत्तास्थापनेच्या नाट्यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, तामिळनाडूचे राज्यपाल हे भाजपचे एजंट आहेत, भाजपच्या हितासाठी ते संविधानाची पायमल्ली करत आहेत. विजयला (सर्वात मोठ्या पक्षाचा नेता) सत्तास्थापनेसाठी बोलवा, त्यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ द्या, असे म्हणत कपिल सिब्बल यांनी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्यावर जोरदार टीका केली आहे. विजय यांना बहुमत सिद्ध करण्यासाठी सभागृहात विश्वासदर्शक ठराव मांडू द्या. निवडणुकीनंतरची कोणतीही आघाडी बहुमतात नाही. सरकारीया आयोगाने हे तत्त्व स्पष्टपणे मांडले आहे. हा आता प्रस्थापित कायदा आहे. पण ऐकतो कोण? असा सवाल सिब्बल यांनी उपस्थित केला.

------------

**विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या**

मान्यतेच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या कायद्याअंतर्गत असलेल्या तरतूदी विचारात घेऊन त्यानुसार कारवाई करण्याचेही निर्देश मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले. तसेच चंद्रकांत पाटील यांनी महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तत्र प व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्याचेही निर्देश दिले. त्याचप्रमाणे सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची मान्यता तपासून घ्यावी उच्च शिक्षण संचालनालय तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा असे आवाहनही केले. या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी आणि मान्यवर अधिकारी उपस्थित होते.

**विशेष कार्यप्रणाली तयार करा**

भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी विभागाने एक विशेष कार्यप्रणाली तयार करावी. त्याचप्रमाणे वांद्रे येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या १३२ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातून नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील रिकगनिशन प्रायर लर्निंग तरतूदीनुसार या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासले जाईल यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदने अभ्यासून त्यानुसार कार्यवाही करावी अशा सूचनाही दिल्या.

---------------

**सोहराबुद्दीन बनावट चकमक प्रकरणात**

याचिकाकर्त्यांनी केला होता. महत्त्वाच्या साक्षीदारांनी साक्ष फिरवली असतानाही दंडाधिकाऱ्यांना साक्ष देण्यासाठी पाचारण करण्यात आले नाही, असा मुख्य आक्षेप घेण्यात आला होता. संबंधित याचिका २०१९ पासून प्रलंबित होत्या आणि २०२५ मध्ये न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला होता. सुनावणीदरम्यान सीबीआयने स्पष्ट केले की, त्यांनी कनिष्ठ न्यायालयाचा निकाल मान्य केला असून, त्याला आव्हान न देण्याचा निर्णय घेतला आहे. रुबाबउद्दीन यांनी यापूर्वी गृह मंत्रालय आणि सीबीआय संचालकांना पत्र लिहून सरकारी स्तरावर या निकालाला आव्हान देण्याची विनंती केली होती. २३ नोव्हेंबर २००५ रोजी सोहराबुद्दीन शेख, कौसर बी आणि तुलसीराम प्रजापती यांना हैदराबादहून सांगलीला जाणाऱ्या लक्झरी बसमधून कथितपणे अपहरण करण्यात आले. सीबीआयचा दावा होता की, शेख आणि प्रजापती यांना बनावट चकमकीत मारले गेले, तर कौसर बी यांची हत्या करून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली. हे प्रकरण गुजरातमध्ये दाखल झाले होते, परंतु २०१२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ते मुंबईत वर्ग केले.विद्यमान केंद्रीय मंत्री अमित शहा हे देखील या प्रकरणात आरोपी होते, मात्र २०१४ मध्ये न्यायमूर्ती एम.बी. गोसावी यांनी त्यांची पुराव्याअभावी या प्रकरणातून मुक्तता केली होती.

--------

**आज दहावीचा निकाल**

कार्यालयात अधिकृत पत्रकार परिषद होणार असून, त्यानंतर दुपारी विद्यार्थ्यांना ऑनलाईन निकाल पाहता येणार आहे. विद्यार्थ्यांना आपला निकाल पाहण्यासाठी सीट नंबर आणि आईचे नाव आवश्यक असणार आहे. निकाल पाहण्यासाठी मंडळाकडून अधिकृत वेबसाइट उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दरम्यान, बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष दहावीच्या निकालाकडे लागले आहे. निकालानंतर विद्यार्थ्यांना गुणपत्रिका संबंधित शाळांमधून उपलब्ध करून दिली जाणार आहे. दरम्यान, निकालानंतर विद्यार्थ्यांना स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) इतर कोणत्याही विशिष्ट विषयांत विद्यार्थ्याला गुणांची पडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकन किंवा स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने स्वतः किंवा शाळामार्फत अर्ज करता येईल. गुणपडताळणी आणि छायाप्रतीसाठी ९ मे ते २३ मे पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येणार असल्याचे राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे.

--------------

**जालन्यात नशाच्या**

आदेशाने अन्न व सुरक्षा विभागाचे अधिकारी व पंच व पोलीस स्टाफ सह सदर गोडावून वर छापा मारला असता गोडावून मालक शेख जमीर शेख जहीर वय ३० वर्ष रा. कानडी वस्ती, अग्रेसन नगर जवळ जालना याचे ताब्यातून नशा करण्यासाठी वापरण्यात येणारे गुंगीकारक इंजेक्शन च्या २० बाटल्या व नशेच्या गोळया असा एकुन २३४८०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री. तेगबीरसिंह संधु, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री संदीप भारती यांचे नेतृत्वात डीबी, पथकाचे प्रमुख पोउपनि सचिन सानप, पोहेकॉ/१३९३ नजीर पटेल, पोकॉ/९६३ दुर्गेश गोफणे, पोकॉ/२३० अझीम शेख, पोकॉ/१५१९ गणेश तेजनकर, पोकॉ/१४४६ राहूल कटकम, पोकॉ १ ६९८ धनंजय लोढे, मपोकॉ/दिपाली भागवत यांनी केली.

--------

**पशुसंवर्धन विभागात अधिकारी पदासाठी**

उमेदवारांची परीक्षा सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेते होणार असल्याचे नमूद केले आहे. परीक्षेतील गुणांच्या आधारे स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार असून, त्यानंतर पुढील निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

---------

# प्रेमळ, जिवाभावाचा आणि सर्वांना जोडून ठेवणारा मित्र गमावला-आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

**हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झालेल्या सतीश उर्फ बंडू धोंडे यांच्या अकाली जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत असून,त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना आ. सुरेश धस यांनी सध्याच्या बदलत्या जीवनशैलीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली.**

''हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने बंडूसारख्या हसतमुख, मनमिळावू आणि मित्रपरिवार जपणाऱ्या व्यक्तीचे निधन होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. बंडूने आयुष्यभर मैत्रीचे नाते जपले,अनेकांच्या सुख-दुःखात सहभागी झाला.त्याचे व्यक्तिमत्त्व अत्यंत हसरे आणि सर्वांना आपलेसे करणारे होते. अशा व्यक्तीला नको त्या वयात हृदयविकाराचा झटका येऊन आपल्यातून निघून जावे लागणे ही केवळ एका कुटुंबाची नाही तर संपूर्ण समाजाची हानी असल्याचे आ. सुरेश धस म्हणाले. ''सध्याच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे हृदयविकाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.आज दहा पैकी किमान सहा जणांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यामुळे होत असल्याचे चित्र अत्यंत चिंताजनक आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आरोग्याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.नियमित व्यायाम, संतुलित आहार, मानसिक तणावावर नियंत्रण आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे ही काळाची गरज बनली असल्याचे मत धस यांनी व्यक्त केले' बंडू धोंडे यांच्या निधनाने मित्रपरिवार, नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली,त्यांच्या अकाली जाण्याने एक प्रेमळ, जिवाभावाचा आणि सर्वांना जोडून ठेवणारा मित्र गमावल्याची भावना आ.धस यांनी व्यक्त केली.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. ०८ मे २०२६


## थोडक्यात

### सतीश उर्फ बंडू धोंडे सर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी शहरातील फार्मसी महाविद्यालयात लॅब टेक्निशियन म्हणून कार्यरत असलेले, मनमिळावू व सर्वपरिचित व्यक्तिमत्व सतीश उर्फ बंडू धोंडे (वय ५४) यांचे मंगळवारी मध्यरात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने आष्टी शहरावर शोककळा पसरली आहे.

धोंडे सर हे अत्यंत दिलखुलास, मदतीला सदैव तत्पर आणि मित्रपरिवारात लोकप्रिय व्यक्तिमत्व होते. त्यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचा अंत्यविधी बुधवार दि. ६ मे रोजी सकाळी ११ वाजता शहरातील बसस्थानकासमोरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सुरेश आण्णा धस, भीमराव धोंडे, देविदास आबा धस यांच्यासह नातेवाईक, मित्रपरिवार, व्यापारी व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.एक दिलखुलास मनाचा मित्र आम्ही हरपला, अशा शब्दांत विजय क्रीडा मंडळाच्या सर्व मित्रपरिवाराने तीव्र शोक व्यक्त केला.

### डॉ.कमलाकर राऊत यांचे राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील श्री योगेश्वरी नूतन विद्यालय माध्यमिक विभागातील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक, साहित्यिक, वक्ते, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार डॉ.कमलाकर कोंडिबा राऊत यांनी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रभाषा पंडित पदवी परीक्षेत यशस्विता प्राप्त केली आहे.

डॉ.राऊत यांनी सुरूवातीला आय.टी.आय.फिटरच्या आधारे धूत कॉम्पॅक व बजाज कंपनीत कामगार म्हणून कार्य केले. एच.एस.सी., डी.एड. या शैक्षणिक अर्हतेवर १९९७ साली त्यांनी सेवेला प्रारंभ करताच पुढे बहि:स्थ सलग शिक्षण घेऊन एम.ए., एम.एड.,नेट, पीएच.डी., डी.एस.एम., एन.डी - २, एल.टी.सी, साहित्यभूषण, राष्ट्रभाषा प्रवीण ही शैक्षणिक अर्हता धारण केली. नुकतीच त्यांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.ई.), नवी दिल्ली यांच्या वतीने शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेच्या (सी.टी.ई.टी.) दोन्ही परीक्षेत यशस्विता प्राप्त केली आहे. डॉ.राऊत यांची ३ पुस्तके, संपादित पुस्तके, विशेषांक, स्मरणिका, ४३ शोधनिबंध आणि ५०० पेक्षा अधिक लेख, कविता, कथा आजपावेतो प्रकाशित झाल्या आहेत. डॉ.राऊत यांना लेखनासाठी याआधी विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरांवरील पारितोषिके आणि विविध क्षेत्रांतील कर्तृत्वासाठी पुरस्कार प्राप्त झाले आहेत. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या वतीने डॉ.राऊत यांना ५ सप्टेंबर २०१७ रोजी शिक्षक दिनी शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, संशोधन या क्षेत्रांतील कार्यकर्तृत्वासाठी, राष्ट्रपती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. राष्ट्रभाषा पंडित परीक्षेतील सदरील यशाबाबत डॉ.राऊत यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, मी श्री योगेश्वरी नूतन विद्यालयाचा विद्यार्थी असून याच विद्यालयात अध्यापन करीत आहे, याचा मला सार्थ अभिमान वाटत आला आहे. शिक्षकाची भूमिका ही स्वाभाविक, चैतन्यशील आणि चैतन्यदायी असून दैनंदिन परिणामकारक व स्फूर्तीदायी अध्यापनासाठी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पदव्याचा, प्राप्त शिक्षणाचा खूप उपयोग होत आला आहे. सदरील यशस्वितेसाठी डॉ.कमलाकर राऊत यांचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर, सर्व सन्माननीय संचालक, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती ए.आर.पाठक, उपमुख्याध्यापक विलास गायकवाड, पर्यवेक्षक रवी मठपती, बंधू विष्णू राऊत, सहकारी शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले आहे.



# शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची मागणी

## अमर नाईकवाडे व फारूक पटेल यांचे नगर परिषद प्रशासनाला निवेदन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाने दिनांक २५ मार्च २०२६ रोजी महत्त्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित करून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अंतर्गत दिनांक ०१/०१/२०२२ पर्यंतची शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. या शासन निर्णयाच्या अनुषंगाने बीड शहरातील पात्र नागरिकांना न्याय मिळावा व त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी बीड नगर परिषद प्रशासनाने तात्काळ विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारुख पटेल यांनी केली आहे.



यासंदर्भात नगर परिषद बीडचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून त्यामध्ये रामतीर्थ, भीमनगर, जुना मोंढा, पुनर्वसन कॉलनी, म्हाडा कॉलनी, इंदिरा नगर, प्रकाश आंबेडकर नगर आदी भागांमध्ये अनेक नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र संबंधित जागांची अधिकृत मालकी नसल्यामुळे या नागरिकांना घरकुल योजना, शासकीय सुविधा व विविध विकास योजनांचा लाभ घेण्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

राज्य शासनाच्या नव्या निर्णयामुळे अशा नागरिकांना त्यांच्या वास्तव्यास असलेल्या जागांचे नियमितीकरण करून कायदेशीर हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून वार्ड अधिकारी व बिल कलेक्टर यांच्या माध्यमातून अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया प्रभावीपणे सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच संबंधित वस्त्यांमध्ये जनजागृती करून पात्र नागरिकांना अर्ज दाखल करण्यास प्रोत्साहित करावे व प्रक्रिया पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने राबवावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

अमर नाईकवाडे यांनी यापूर्वी सन २०१९ च्या शासन निर्णयानुसार देखील सातत्याने पाठपुरावा करून संबंधित भागांचे सर्वेक्षण करून प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आल्याचे सांगितले. त्या प्रस्तावांवरही गांभीर्याने विचार करून लवकर निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली आहे.

''गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या गरीब व सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या घरांवर कायदेशीर हक्क मिळणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल,'' असे अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी म्हटले आहे. या निवेदनाची प्रत मा. जिल्हाधिकारी, बीड व आमदार विजयसिंह पंडित यांनाही माहिती व पुढील कार्यवाहीसाठी देण्यात आली आहे.

# मानवता फाउंडेशनचे भिक्खू संघाच्या हस्ते लोकार्पण

## मानवता फाउंडेशन लोकहिताचे काम करणार –भिक्खू धम्मशील थेरो

बीड । प्रतिनिधी

बुद्ध पौर्णिमेच्या मंगलदिनी बुद्ध तत्त्वज्ञानावर आधारित बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीद घेऊन शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, संवैधानिक न्याय, महिला व बाल सक्षमीकरण ही मुख्य उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मानवता फाउंडेशन चे धम्मभूमी बुद्ध विहार डॉ. भदंत आनंद कौशल्य या नगर शिवणी येथे बुद्ध जयंती महोत्सवामध्ये डॉ. भिक्खू इंदवंश महाथेरो (छ. संभाजीनगर), धम्मभूमी शिवणीचे निर्माते भिक्खु धम्मशील थेरो (हिंगोल/बीड), भिक्खू संघ व विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये लोकार्पण संपन्न झाले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, ड. राजेश शिंदे हे मागील अनेक वर्षापासून महाराष्ट्रभर सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत मागील पंधरा वर्षांमध्ये त्यांनी विविध माध्यमातून लोकांना मदत करण्याचं कर्तव्य निभावलेले आहे. संस्थात्मक काम करण्याच्या भावनेने त्यांनी मानवता फाउंडेशन ची निर्माण केली असून



येणाऱ्या काळात अधिक गतीने काम करण्याचा त्यांचा हेतू आहे.

बौद्ध पौर्णिमेच्या मंगल दिनी मानवता फाऊंडेशन ची सुरुवात करून बुद्धांच्या मानवतेचा संदेश पुढे संकल्प आहे. सम्यक सम बुद्धांच्या मार्गदर्शक पंचशील तत्त्वाप्रमाणे शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, संविधानिक न्याय , महिला आणि बाल सबलीकरण ही पाच मुख्य उद्दिष्ट घेऊन मानवता फाऊंडेशन काम करणार आहे. या लोकार्पण कार्यक्रमास डॉ. भिक्खू इंदवंश महाथेरो (छ. संभाजीनगर), धम्मभूमी शिवणीचे निर्माते भिक्खु धम्मशील थेरो (हिंगोल/बीड), भिक्खू रेवतबोधी थेरो (नांदेड), भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली),श्रामनेर भंते बुद्ध बोधी (शिवणी),मा. सचिन पांडकर साहेब,अतिरिक्त पोलीस अधिक्षक, बीड, तुळशी शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, रिपाईचे राजू जोगदंड, प्रा. प्रेमचंद शिरसाट, जी. एम. भोले, प्रा. राम गायकवाड, प्रदीप घाडगे, मेजर राजाभाऊ आठवले, ड. राजेश वाघमारे, पत्रकार तथा सदस्य सुनील डोंगरे, राजू डोळस, अलका आठवले, सविता पाटील, रजनीकांत वाघमारे, प्रवीण टाकणकर, सौरभ तुरुकमारे, यशपाल डावकर, युवराज जाधव, संस्थेचे अध्यक्ष ड. राजेश शिंदे, उपाध्यक्ष मोहन खेमाडे, संस्थेचे सचिव सचिन शिंदे, यांच्यासह भिक्खू संघ, विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी कार्यक्रमास आलेले उपासक उपासिका, व प्रियदर्शी धम्म संस्कार संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष ड. राजेश शिंदे हे मागील अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असून गोरगरीब लोकांना वाट्टेल ती मदत, पोलीस स्टेशन पासून ते सरकारी दवाखान्यापर्यंत ते अहोरात्र राबत असतात. कोविड काळामध्ये त्यांनी केलेले काम उल्लेखनीय असून जगभरातून मदत घेत त्यांनी जिल्ह्यातील कानाकोपऱ्यामध्ये लोकांना वाचवण्याचं काम केलेलं आहे. रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक जागृती, संविधानिक जागृती, पर्यावरण रक्षण, रस्त्यावरील लोकांच्या मदतीला जाऊन जाणे यासह अनेक प्रकारची मदत त्यांनी आतापर्यंत केलेली आहे.

# पोक्सो प्रकरणात दिलासा: अ‍ॅड. दीपक ससाणे यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपीस जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

बीड येथील पोक्सो प्रकरणातील आरोपीस बीड सत्र न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला असून, या निकालामध्ये अ‍ॅड. दीपक ससाणे यांच्या प्रभावी युक्तिवादाची महत्त्वपूर्ण भूमिका ठरली आहे.



उपलब्ध फिर्याद आणि एफआयआरनुसार, सदर प्रकरणात प्रतीक प्रमोद धर्माधिकारी यांच्या विरोधात भारतीय दंड संहिता कलम २९४ तसेच पोक्सो कायदा २०१२ अंतर्गत कलम १३ व १४, आणि माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अंतर्गत कलम ६७ व ६७(बी) अशी गंभीर कलमे लागू करण्यात आली होती. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, सोशल मीडियाद्वारे आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित केल्याचा आरोप होता. या प्रकरणाची नोंद बीड सायबर पोलिस ठाण्यात करण्यात आली होती. सदर केस अ‍ॅड.ससाणे यांच्याकडे सोपवण्यात आल्यानंतर त्यांनी न्यायालयात तथ्यांवर आधारित आणि कायद्याच्या चौकटीत राहून भक्कम युक्तिवाद मांडला. पुराव्यांची स्थिती, तपासातील बाबी आणि कायदेशीर मुद्दे प्रभावीपणे मांडल्यामुळे न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला. या निर्णयानंतर आरोपीच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले असून, बीडमधील नागरिकांकडून अ‍ॅड.ससाणे यांचे अभिनंदन केले जात आहे.या महत्वपूर्ण कामात ड.ससाणे यांना ड.नामदेव जाधव, ड.अजित ओव्हाळ यांनी मोलाचे सहकार्य केले. अल्पावधीत जामीन मिळवून देण्याच्या त्यांच्या कामगिरीमुळे ते एक नामांकित आणि विश्वासार्ह वकील म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत. कायदेशीर क्षेत्रात सातत्याने प्रभावी कामगिरी करणारे अ‍ॅड. दीपक ससाणे यांच्याकडे आता अनेक प्रकरणांमध्ये आशेने पाहिले जात आहे.

# ज्ञानराधा मल्टीस्टेटचा 'वसुली' एक्सप्रेस सुसाट, पण सामान्यांच्या 'परताव्याला' मात्र रेड सिग्नल!

बीड/पाटोदा । प्रतिनिधी

जिल्ह्यासह अवघ्या महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या 'ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी'च्या घोटाळ्याला आता काळ लोटला असला, तरी सामान्यांच्या जखमा अजूनही ओल्याच आहेत. प्रशासकाची नियुक्ती होऊन वसुलीची कागदी घोडी वेगाने धावत आहेत, मालमत्ता जप्तीचा धडाका सुरू आहे, पण या प्रक्रियेत 'ठेवीदार' नावाचा केंद्रबिंदू मात्र पूर्णपणे गायब आहे. वसुली सुरू आहे, मग आमचे पैसे कुठे गेले? असा संतप्त सवाल आता पाटोद्याच्या गल्लीबोळापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत घुमू लागला आहे.वसुलीचा 'बाऊ', पण परताव्याचा पत्ता नाही!संस्थेवर सध्या प्रशासकीय राजवट आहे. कर्ज वसुलीसाठी जप्त्या, नोटिसा आणि लिलावाच्या प्रक्रियेचा मोठा गाजावाजा केला जात आहे. मात्र, जप्त केलेल्या या कोट्यवधींच्या

### राजकीय नेत्यांची निवडणुकीपुरतीच आश्वासने; पाटोदा-बीडसह राज्यातील लाखो ठेवीदार वाऱ्यावर!

मालमत्तेचा पैसा जातो कुठे? हा खरा प्रश्न आहे. प्रशासकीय अधिकारी वसुलीचा आकडा सांगण्यात जेवढे तत्पर आहेत, तेवढेच ठेवीदारांच्या परताव्याबाबत 'ब्र' काढायला तयार नाहीत. आश्वासनांच्या डोसवर किती दिवस जगायचे? असा आर्त टाहो सामान्य ठेवीदार फोडत आहेत.पुढाऱ्यांची 'चुना' लावणारी नीती!निवडणुकीच्या रणधुमाळीत तुमचे पैसे मी मिळवून देतो असे छातीठोकपणे सांगणारे नेते आता खुर्ची मिळताच 'ज्ञानराधा'चा विषय विसरले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रश्नावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते, पण त्याची अंमलबजावणी अद्याप कागदावरच आहे. नेत्यांना फक्त आमचे मतदान हवे आहे, आमचे कष्ट नव्हे, अशी भावना आता मतदारांमध्ये निर्माण झाली आहे. राजकीय नेते आणि प्रशासन संगनमताने हा विषय थंड बस्त्यात टाकत असल्याचा संशय आता बळावला आहे.आयुष्याची कमाई अडकली, जबाबदार कोण?कुणाचे मुलीचे लग्न आहे, कुणाला औषधोपचारासाठी पैशांची नड आहे, तर कुणी वृद्धापकाळाची पुंजी म्हणून हे पैसे बँकेत ठेवले होते. आज पाटोदा तालुक्यातील हजारो कुटुंबे या संकटामुळे रस्त्यावर आली आहेत.ठेवीदारांची प्रमुख मागणी:१. जप्त केलेल्या मालमत्तेचा त्वरित जाहीर लिलाव करावा.२. वसुली झालेला पैसा प्राधान्याने छोट्या ठेवीदारांना वाटप करावा.३. परताव्याचा निश्चित कालबद्ध कार्यक्रम प्रशासनाने जाहीर करावा.प्रशासनाने जर आताही डोळे उघडले नाहीत, तर हा असंतोष रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा संतप्त ठेवीदारांनी दिला आहे.

# शुभकार्याचा बाजार की लग्नाचा इव्हेंट? मुहूर्त बाजूला; डीजे, सत्कार आणि फोटोसेशनमध्ये विवाहसंस्कार हरवला

**आष्टी । शरद रेडेकर**

विवाह हा हिंदू संस्कृतीतील सोळा संस्कारांपैकी एक पवित्र संस्कार दोन जीवांसह दोन कुटुंबांना जोडणारा मंगल सोहळा देव- ब्राह्मणांच्या साक्षीने, शुभमुहूर्तावर संपन्न होणारे हे कार्य एकेकाळी श्रद्धा, संस्कार आणि शिस्तीचे प्रतीक मानले जात होते. मात्र काळ बदलला आणि लग्नसोहळ्यांचे स्वरूपही बदलले. आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, शुभकार्य म्हणून ओळखला जाणारा विवाहसोहळा आता केवळ दिखावा, प्रतिष्ठा आणि राजकीय गर्दीचा इव्हेंट बनत चालल्याचे वास्तव समोर येत आहे.

पूर्वी लग्न म्हणजे घरातील आनंदाचा प्रसंग आप्तस्वकीयांचा स्नेहमेळावा विधींना प्राधान्य आणि वेळेचे काटेकोर पालन! आज मात्र लग्नाचा केंद्रबिंदू नवरा-नवरी नसून डेकोरेशन, एन्ट्री, डीजे, ड्रोन कॅमेरे आणि सोशल मीडियावरील रील्स बनल्या आहेत. लाखो रुपये खर्चून उभारलेले स्टेज, लाईटिंग आणि फोटोग्राफीच्या चमकधमकात विवाहसंस्काराचे पावित्र्य हरवताना दिसत आहे.

**मुहूर्त काढला जातो पण पाळतो कोण?**

ब्राह्मणांनी काढलेला शुभमुहूर्त हा पूर्वी अंतिम मानला जायचा. मात्र आता मुहूर्त हा फक्त पत्रिकेवर छापण्यासाठी उरला आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. कारण ठरलेल्या वेळेला नवरा स्टेजवर नसतो, नवरी मेकअपमध्ये व्यस्त असते, तर पाहुणे डीजेच्या तालावर थिरकत असतात. परिणामी, विवाहविधी उशिरा सुरू होतात आणि शुभमुहूर्त केव्हा निघून जातो हेही कोणाच्या लक्षात येत नाही.

**लग्नात पाहुणे कमी; पुढाऱ्यांचे शक्तिप्रदर्शन जास्त!**

एकेकाळी लग्नात मोजक्या मान्यवरांचा सत्कार व्हायचा. आज मात्र परिस्थिती अशी झाली आहे की, लग्नसमारंभ हा राजकीय शक्तिप्रदर्शनाचा मंच बनला आहे. कोणत्या पुढाऱ्याला पुढच्या खुर्चीत बसवायचे, कोणाचा मोठा सत्कार करायचा, कोणाच्या हस्ते आशीर्वाद द्यायचा यावरून आयोजकांची धावपळ सुरू असते. स्टेजवर एकामागोमाग एक सत्कार सुरू असताना विवाहविधी मात्र रखडलेले दिसतात.

आशीर्वादापेक्षा भाषणांचीच रेलचेल

हरिभक्त महाराज, मान्यवर, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते अशा डझनभर लोकांना स्टेजवर बोलावले जाते. प्रत्येकजण आशीर्वादापेक्षा भाषणातच अधिक रंगलेला दिसतो. परिणामी, लग्नसोहळा हा मंगल विधी कमी आणि सार्वजनिक कार्यक्रम जास्त वाटू लागला आहे.

**डीजेच्या दणदणाटात मंत्रोच्चार हरवले**

नवरदेवाच्या मिरवणुकीत डीजेचा कर्णकर्कश आवाज, बेभान होऊन नाचणारे कलवरे आणि रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी हे चित्र आता सर्वसामान्य झाले आहे. एवढेच नव्हे तर मंडपातही डीजेच्या आवाजामुळे ब्राह्मणांचे मंत्रोच्चार ऐकू येत नाहीत. मंगलाष्टक ऐकण्याऐवजी लोक मोबाईलमध्ये व्हिडिओ शूट करण्यात व्यस्त असल्याचे चित्र दिसते.

विवाहसंस्कार की प्रतिष्ठेची स्पर्धा?

आज लग्न म्हणजे प्रेम, संस्कार आणि नातेसंबंध यापेक्षा कोणाचे लग्न जास्त भव्य? याची स्पर्धा झाली आहे. लाखो रुपयांची उधळण, महागडे डेकोरेशन, शेकडो पदार्थांची मेजवानी आणि सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्याच्या नादात विवाहसंस्काराचा मूळ आत्माच हरवत चालल्याची भावना ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहेत.

**संस्कार वाचवायचे की इव्हेंट वाढवायचा?**

आधुनिकतेचा स्वीकार चुकीचा नाही; पण त्याच्या आहारी जाऊन संस्कारच विसरणे कितपत योग्य? हा प्रश्न आता समाजाने स्वत:लाच विचारण्याची वेळ आली आहे. अन्यथा येणाऱ्या काळात लग्नसोहळे हे शुभमंगल सावधानपेक्षा लाईट कॅमेरा ॲक्शन! या शब्दांनीच अधिक ओळखले जातील, अशी उपरोधिक चर्चा समाजात रंगू लागली आहे.

## पान ६ वरुन...

### पर्यावरणास हाणी पोंहचवणारा

मुख्याधिकारी यांना निवेदन देत सरस्वती नदीवरील प्रस्तावित प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे.परळी वैजनाथ शहरातुन वाहत असलेल्या सरस्वती नदीमुळे शहराचा पर्यावरणीय समतोल राखण्यास मोठी मदत होते.या नदीच्या पाण्यामुळे पाणीपातळीसह,तापमानात समतोल राखला जातो.या नदीच्या पाण्यामुळे अंबेवेस, गणेशपार,बरकत नगर,कृष्णा नगर,शिवनगर,इंदिरा नगर,पद्मावती गल्ली,आझाद नगर अशा अर्ध्या परळी शहराची पाणीपातळी अवलंबुन आहे.परळी नगरपालिका सध्या सरस्वती नदीवर शासनाचा प्रोजेक्ट राबवण्याच्या तयारीत असुन यामध्ये दोन्ही बाजुंनी भिंती व तळाला क्राँक्रीट केले जाणार असल्याने केंद्र व राज्य शासनाच्या पाणी अडवा पाणी जिरवा या मोहिमेला छेद बसण्याबरोबरच पवित्र सरस्वती नदीचे नैसर्गिक अस्तित्व नष्ट होणार आहे.आपण महाराष्ट्रात इतर ठिकाणच्या नद्यांचे सुशोभिकरण करुन पर्यावरणाचा समतोल राखला जात असताना सरस्वती नदीचे मात्र सिमेंटीकरण करण्यात येत आहे.पवित्र सरस्वती नदीवर पर्यावरणपुरक असा सुशोभिकरणाचा प्रोजेक्ट राबवावा ही विनंती.सरस्वती नदीपात्रातील अतिक्रमण हटवुन नदीचे पात्र मोकळे करत काही ठिकाणी घाट,वॉकिंग ट्रॅक,झाडे-हिरवळ लावुन सुशोभिकरण झाले तर ही परळी शहरातील नागरीक आणि बाहेरगावहुन येणार्या वैद्यनाथ भक्तांसाठी मोठी उपलब्धी असेल.तरी आपण या जनभावनेचा विचार करुन सध्याचा सिमेंट काँक्रीटीकरणाचा प्रस्ताव रद्द करुन पर्यावरणपूरक प्रस्ताव राबवावा अन्यथा आम्ही सर्व वैद्यनाथभक्त आंदोलन करणार असल्याचा इशारा सौ.वर्षाताई जोशी यांनी दिला आहे.या निवेदनाच्या प्रति पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे,माजी मंत्री आ.धनंजय मुंडे,जिल्हाधिकारी बीड,उपविभागिय अधिकारी परळी वैजनाथ यांना देण्यात आल्या आहेत.

### उष्णतेने होरपळणाऱ्या

करा: वीज कधी जाणार आणि कधी येणार याचे निश्चित वेळापत्रक महावितरणने जाहीर करावे.पुरेशी यंत्रणा: तक्रार निवारणासाठी अधिक कर्मचारी नियुक्त करावेत आणि तांत्रिक बिघाड तातडीने दुरुस्त करावेत.प्रशासनाला इशारामहावितरणने याकडे वेळीच लक्ष देऊन उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा पाटोदा तालुक्यातील संतप्त नागरिकांनी दिला आहे. रास्ता रोको, धरणे आंदोलन किंवा कार्यालय बंद करण्याचा इशारा देण्यात आला असून, प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी होत आहे.

### गंगामसला येथे शेकापचे

आंदोलन गेल्या दोन दिवसापासून सुरु आहे. या आंदोलनात शेकापचे ॲड. भाई नारायण गोले पाटील, परमेश्वर डाके, भाई राहुल सोळंके, भाई मुंजा पांचाळ, भाई अभिषेक सोळंके, अमोल सोळंके, राजू शेख, हनुमान पांचाळ, रणधीर सोळंके सहभागी झाले आहेत.

### शासन आपल्या दारी

संख्येने उपस्थित होते. शासनाच्या विविध योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत आणि प्रत्येक पात्र लाभार्थ्याला त्याचा हक्काचा लाभ मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने हे अभियान सुरू केले आहे. गावागावांत राबविण्यात येणाऱ्या या शिबिरांमुळे प्रशासन आणि सामान्य जनता यांच्यातील दरी कमी होत असून, शासन सेवा अधिक पारदर्शक आणि गतिमान होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

### किसन उबाळे पीएसआय

उबाळे, पीएसआय किसन उबाळे यांचे चुलते मनोहरराव उबाळे, नारायणराव उबाळे यांच्यासह गावातील तरुणांना सतत मार्गदर्शन करणारे अंकुश काका उबाळे, जिल्हा ग्रामसेवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बळीराम अण्णा उबाळे, बबनराव उबाळे,युवक नेते संदीपराव उबाळे, गावचे नूतन पोलीस पाटील ज्ञानेश्वर बबनराव उबाळे, पीएसआय सारूक साहेब, गोकुळ महाराज उबाळे, पोलीस जमादार उबाळे साहेब, माणिकराव शिंदे,श्रीकृष्ण उबाळे महाराज, क्रीडा शिक्षक सतीश उबाळे सर, सीए गणेश शिंदे, संजय कळसे, पंजाब कळासे, विजय कळासे, लक्ष्मण बहिर, चेअरमन अनुरथ मस्के, श्रावण बप्पा मस्के, सोमनाथ मस्के, विलास मस्के, पालवन सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन भगवान मस्के, स्वप्निल मस्के, रवी घुमरे, इंजिनीयर अमोल उबाळे, उद्योजक जीवन बंड, अजय चव्हाण सर, मुकुंद उबाळे यांच्यासह गावातील शेकडो नागरिक माता भगिनी तसेच पंचक्रोशीतील मित्रपरिवार व सगे सोयरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस पाटील ज्ञानेश्वर उबाळे तर आभार प्रदर्शन संदीप उबाळे यांनी केले.

### भारतीय कम्युनिस्ट पक्ष बीड

परिस्थिती दयनीय असतानाही देखील नाही रे वर्गासाठी अतुलनीय विचारवंत म्हणून त्यांनी केलेले लेखन कार्य अमोल आहे.

संपादक कॉम्रेड शेखर कुमार यांनी दास कॅपिटल या ग्रंथाचे वाचन व अभ्यास करण्याचे आवर्जून सुचविले आहे

कॉम्रेड रंजना उरकुडे प्रसंगोचित मनोगत व्यक्त केले

महाराष्ट्र राज्य किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य कॉम्रेड डीजे तांदळे यांच्या अध्यक्षतेखाली व पक्षाचे जिल्हा सरचिटणीस कॉम्रेड भाऊ प्रभाळे राज्य राज्य कौन्सिल सदस्य कॉम्रेड रंजना हुरकुडे किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड ज्योतीराम हुरकुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास ज्येष्ठविधीज्ञ हा कॉम्रेड भीमराव चव्हाण कॉ. तुकाराम पवार-ठाकूर, मुख्याध्यापक कॉम्रेड विनोद सवासे, लाडकी लेक अभियान चे जिल्हा समनव्ययक व एकल महिला संघटनेत कार्यरत सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे धम्मा देवडे आयुब खान पठाण अलीम इनामदार शकील फारुकी मोहन वायकर अखिल शेख सलीम शेख गणेश गाडे युसुफ शेख आबरा शेख बाळू गाडे यांच्यासह पुष्कळ कार्यकर्ते उपस्थित होते सभेचे संचालन जिल्हा सेक्रेटरी बहूप्रमाणे यांनी केले तर आभार किसान सभेचे जिल्हा सरचिटणीस कॉम्प्रेस ज्योतीराम मुरकुटे यांनी मांडले.

cmyk

# अन्न महामंडळाकडे उद्दिष्टाच्या तिप्पट साठा; केंद्र सरकारची आकडेवारी समोर

दिल्ली / वृत्तसंस्था

१ एप्रिलपर्यंत भारतीय अन्न महामंडळ अर्थात एफसीआयच्या गोदामांमध्ये गहू आणि तांदळाचा साठा ६०४ लाख टन असून, हा साठा सरकारने निश्चित केलेल्या २१० लाख टन संरक्षित साठ्याच्या (बफर स्टॉक) तिप्पट असल्याचे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

तांदळाचा साठा ३८६ लाख टन इतका असून तो १३५.८० लाख टनांच्या उद्दिष्टापेक्षा खूप जास्त आहे. तर गव्हाचा साठा २१७ लाख टनांवर असून ७४.६० लाख टनांच्या उद्दिष्टांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात अधिक आहे.

बफर स्टॉकचे निकष दर तीन महिन्यांनी बदलले जातात. सध्या लागू असलेले निकष १ एप्रिलच्या निर्णयानुसार घेतलेले आहेत. पुढील सुधारित निकष १ जुलैपासून लागू होणार आहेत. सरकार सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) आणि इतर अन्न कल्याण योजनांतील लाभार्थ्यांना पुरेसा अन्नपुरवठा करण्यासाठी गहू आणि तांदळाचा बफर साठा करत असते. २०२६ च्या रब्बी हंगामातील गहू आणि तांदूळ खरेदी सध्या सुरू आहे. यंदा ३३४.१७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरलेल्या गव्हापैकी सुमारे ९७ टक्के क्षेत्राची कापणी पूर्ण झाली आहे. तसेच कडधान्यांची कापणीही पूर्ण झाली आहे. भात कापणी सध्या ५९.३२ टक्क्यांवर असून तमिळनाडू, केरळा, त्रिपुरा, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमध्ये सुरू आहे. सरकारी आकडेवारीनुसार, बहुतांश रब्बी पिकांचे खुल्या बाजारातील दर सध्या हमीभावापेक्षा कमी आहेत.



देशातील प्रमुख बाजारात गव्हाचा भाव प्रतिक्विंटल २ हजार ५३० रुपये होता. तर सरकारने २ हजार ५८५ रुपयांच्या हमीभाव जाहीर केलेला आहे.

म्हणजेच हमीभावापेक्षा २.१३ टक्के कमी आहे. धानाचे दर वर्षभरापूर्वीच्या तुलनेत ३.१७ टक्क्यांनी घटून २ हजार २९४ रुपये प्रतिक्विंटल झाले. तर मक्याचे दर २३.७१ टक्क्यांनी घसरून १ हजार ८३१ रुपये प्रतिक्विंटल झाले असून मक्याचा हमीभाव २ हजार ४०० रुपये जाहीर करण्यात आलेला आहे. तसेच तूर, मूग, बाजरी आणि सूर्यफूल या पिकांचे बाजारभावही हमीभावापेक्षा कमी असल्याचे दिसून आले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६३ : आंतरराष्ट्रीय मानवतावादी चळवळ म्हणजेच आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस चळवळीची स्थापना करण्यात आली.
१८८६ : डॉ.जॉन स्टाइथ पेम्बरटनने कोका कोला प्रथमतः तयार केले.
१८९९ : क्रांतिकारक वासुदेव चाफेकर यांना फाशी.
१९१२ : पॅरामाउंट पिक्चर्स या कंपनीची स्थापना झाली.
१९३२ : पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांचे शिष्य पं. विनायकराव पटवर्धन यांनी पुणे येथे गांधर्व महाविद्यालय सुरू केले.
१९३३ : महात्मा गांधींचे २१-दिवसांचे उपोषण चालू.
१९४५ : दुसरे महायुद्ध युरोप विजय दिन जर्मनीची दोस्त राष्ट्रांसमोर बिनशर्त शरणागती, युरोपमधील युद्ध समाप्त.
१९५४ : केंद्र सरकारने चंद्रनगरला पश्चिम बंगाल प्रांतात समाविष्ट केले.
१९६२ : पश्चिम बंगाल येथील कोलकाता येथे रवींद्र भारती विद्यापिठाची स्थापना.
१९७४ : रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप झाला. सरकारविरुद्धचा असंतोष वाढत जाऊन आणीबाणी पुकारली जाण्याला जी कारणे घडली, त्यात हा संप महत्त्वाचा मानला जातो.
१९९४ : ब्रिटन व फ्रान्सला जोडणार्या इंग्लिश खाडीच्या खालून खोदलेल्या युरो टनेल या बोगद्याचे उदघाटन
२००४ : प्रसिद्ध श्रीलंकन क्रिकेटपटू गोलंदाज मुथैया मुरलीधरन यांनी ५२१ खेळाडू बाद करण्याचा विश्वविक्रम आपल्या नावे केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : रेड क्रॉस या संस्थेचे सहसंस्थापक हेनरी डूनेंट यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑक्टोबर १९१०)
१९०६ : भारताचे माजी भूसेनाप्रमुख प्राणनाथ थापर यांचा जन्म.
१९१६ : स्वामी चिन्मयानंद यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑगस्ट १९९३)
१९१६ : भारतीय सिनेमॅटोग्राफर रामानंद सेनगुप्ता यांचा जन्म.
१९२६ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार तपन राय चौधरी यांचा जन्मदिन.
१९२९ : भारतीय पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण तसचं हिंदुस्थानी संगीत क्षेत्रांत दिला जाणारा संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित बनारस घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका गिरीजा देवी यांचा जन्मदिन. त्यांनी गायिलेला ठुमरी हा शास्त्रीय संगीत प्रकारासाठी त्या विशेष ओळखल्या जातात.
१९७० : ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू मायकेल बेव्हन यांचा जन्म.
१९८९ : भारतीय बेसबॉलपटू दिनेश पटेल यांचा जन्म.
१८१७ : देवेंद्रनाथ टागोर ह्याचा जन्मदिवस

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२० : पाली भाषा व बौद्ध साहित्य या विषयावरचे अभ्यासक चिंतामण वैजनाथ राजवाडे यांचे निधन.
१९१५ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्यसेनानी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राजकीय नेता अमीरचंद बोंबवाल यांचे निधन.
१९२० : भारतीय प्राचीन कालीन भाषा पाली व बौध्द साहित्याचे अभ्यासक चिंतामण वैजनाथ राजवाडे यांचे निधन
१९७२ : भारत रत्न पुरस्कृत पांडुरंग वामन काणे यांचे निधन. (जन्म: ७ मे १८८०)
१९८१ : संस्कृतज्ञ, मराठी कवी डॉ. केशव नारायण वाटवे यांचे निधन.
१९८२ : अनिल उर्फ कवि अनिल (आत्माराम रावजी देशपांडे), मराठी कवी.
१९९३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय इतिहासकार व मार्क्सवादी तत्त्ववेत्ता देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांचे निधन.
१९९५ : पत्रकार, संपादक, राजकीय विश्लेषक आणि मुत्सद्दीप्रेम भाटिया यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९११)
१९९५ : देवदेवतांची आणि संतांची चित्रे यामुळे प्रसिद्ध असलेले चित्रकार जि. भी. दीक्षित यांचे निधन.
१९९९ : कलादिग्दर्शक श्रीकृष्ण समेळ यांचे निधन.
२००३ : संस्कृत व प्राकृत विद्वान डॉ. अमृत माधव घाटगे यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९१३)
२०१३ : धृपद गायक झिया फरिदुद्दीन डागर यांचे निधन. (जन्म: १५ जून १९३२)

# जनावरांना चुकिचा चारा दिल्यास होतात टेटॅनी, जठर दाह सारखे आजार



सदोष आहारामुळे जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होतो. असा सदोष चारा खाल्यामुळे जनावरांमध्ये चयापचयाचे आजार दिसून येतात. त्याचा जनावरांच्या दूध उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. जनावरांचे खाद्य ज्या ठिकाणी साठवून ठेवले आहे, तेथे पाणी लागणार नाही याची काळजी घ्यावी, कारण खाद्य ओले झाल्यास बुरशी लागते.

ग्रास टेटॅनी : जनावरे कुरणामध्ये चरायला गेल्यावर जास्त प्रमाणात कोवळे हिरवे गवत मोठ्या प्रमाणावर खातात, त्या वेळी हा आजार उद्भवतो. रक्तातील मॅग्नेशियम क्षाराच्या कमतरतेमुळे हा आजार होतो. अतिरिक्त पोटॅशियम आणि सायट्रिक ॲसिड यामुळे हा आजार होतो. लक्षणे लवकर दिसून येत नाहीत, परंतु ग्रास टेटॅनीमुळे जनावराच्या शरीराचा तोल जातो, जनावर अस्वस्थ असते. शरीराला आकडी येते, जनावर डोके खाली पाडते. जनावर कोमात जाऊन मृत्यू होतो. उपाय - पावसाळ्यात जनावरांच्या आहाराची योग्य काळजी घेतल्यास हा आजार टाळता येतो.

जठराचा दाह : पावसाला सुरवात झाली की कुरणावर चरणाऱ्या जनावरांना हिरवे गवत भरपूर प्रमाणात उपलब्ध होते, ते अधाशीपणाने चारा खातात, चाऱ्यात असणारे काही विषाणू आणि कृमी पोटात संसर्ग करून जठराचा दाह निर्माण करतात. एकदम जास्त धान्य, पीठ अथवा मऊ खाद्य खाल्ल्यामुळे अपचन होते. त्यामुळे जठरात निर्माण होणाऱ्या पाचक रसात अनैसर्गिक बदल होतात. नेहमीच्या चारा पाण्यात अचानक केलेला फेरबदल हे या आजाराचे प्रमुख कारण आहे. रासायनिक खते, फवारणी केलेला चारा सेवन केल्यामुळे पोटाच्या आतील स्लेश्म आवरणास इजा, जखमा होतात. बाधित चारा खाल्ल्यामुळे जिवाणूंचा संसर्ग होतो. जनावरांना कॅल्शिअम, फॉस्फरससारख्या सूक्ष्म घटकांची, जीवनसत्त्वांची कमतरता असेल, तर ते दगड, माती, विटा, मेलेल्या जनावरांची हाडे, प्लॅस्टिक व कागद गिळतात. अपचनामुळे बद्धकोष्ठता होते, पोटात चारा घट्ट होऊन पोटाची हालचाल थांबते, जनावर रवंथ करायचे थांबते, जनावरांना बद्धकोष्ठता झाल्यामुळे चारा खात नाहीत, पोटदुखीची लक्षणे दाखवितात. आंत्राविषार आजाराचे जिवाणू या जनावरांच्या पोटात वाढतात, त्यामुळे त्यांना हगवण लागते. उपाय - जठराचा दाह होऊ नये, तसेच अपचन झालेले असल्यास जनावरांचा चारा, पाण्यातील केले जाणारे फेरबदल टाळावेत. जनावरे अखाद्य वस्तू खाणार नाहीत याची काळजी घ्यावी. अपचनात रेचक देऊन पचनसंस्थेतील अडसर दूर करावा. पचन पूर्ववत होईपर्यंत जनावरांना पचनास हलके आणि काहीसे कमी आणि भरड खाद्य द्यावे. पशुतज्ज्ञांकडून उपचार करावेत.

# शाश्वत पीक उत्पादनासाठी आंतरपीक पद्धती फायद्याची

खरीप हंगामा दरम्यान पावसामध्ये खंड पडणे किंवा अतिवृष्टीमुळे पिकांवर अनिष्ट परिणाम होतात. कधी कधी तर पीक हातचे जाण्याची परिस्थती निर्माण होते. राज्यातील बहुतांश शेती कोरडवाहू असल्याने पूर्णः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचा लहरीपणा हा शेतकऱ्यांकरिता एक चिंतेचा विषय बनलेला आहे. अशा परिस्थितीत फक्त एका पिकावर अवलंबून न राहता आंतरपीक पद्धतीचा अवलंब करून एकापेक्षा अधिक पिकांचा आंतर पीक पद्धतीमध्ये समावेश करणे आवश्यक आहे.



कोरडवाहू क्षेत्रासाठी प्रामुख्याने एक पीक पद्धती,आंतरपीक पद्धती आणि दुबार पीक पद्धतींचा अवलंब, पडणाऱ्या पावसावर आणि जमिनीच्या प्रकारानुसार करावयास हवा.जमीन, हवा,पाणी आणी अन्नद्रव्य या नैसर्गिक घटकांचा समतोल राखण्यासाठी आणि परिणामकारक उपयोग होण्यासाठी मुख्य आणि आंतरपिकांची योग्य निवड करणे हितावह ठरेल. कोरडवाहू क्षेत्रात आंतरपीक पद्धत नेहमीच फायद्याची दिसून आली आहे. आंतरपीक पद्धतीत पिकांची निवड करताना मुख्य आणि आंतरपीक वाढीची पद्धत भिन्न असणे आवश्यक आहे.मुख्य आणि आंतरपिकाच्या परिपक्वतेचा कालावधीत योग्य फरक असणे आवश्यक आहे.कोरडवाहू शेती मध्ये शाश्वत उत्पादनाच्या दृष्टीने योग्य पिके आणि पीक पद्धतीचे आयोजन करणे आवश्यक आहे, कमी कालावधीत येणारी,अवर्षणास प्रतिकारक्षम शिफारशीत वाणांची निवड करावी.स्थानिक परिस्थिती ,पाऊसमान लक्षात घेऊन उत्पादन तंत्र आणि कमी खर्चाच्या उपायांचा उपयोग करावा.कोरडवाहू क्षेत्रात पीक पद्धतीचे नियोजन करताना आवश्यकतेप्रमाणे पर्यायी पिकांचा समावेश करावा.

कोरडवाहू क्षेत्र : कोरडवाहू क्षेत्रामध्ये आंतरपीक पद्धतीची निवड करताना मुख्य आणि आंतरपीक वाढीची पद्धत भिन्न असणे आवश्यक आहे.मुख्य व आंतरपिकाची मुळांच्या वाढीची ( सोटमूळ व तंतुमय) भिन्न असावी.मुख्य व आंतरपिकांच्या पक्वतेचा कालावधी योग्य फरक असावा. मुख्य व आंतरपीक एकमेकास स्पर्धक नसून पूरक असावेत.आंतरपिके ही प्रामुख्याने कडधान्य वर्गातील असावीत.

आपत्कालीन परिस्थितीत आंतरपीक पद्धतींचा अवलंब :

आपत्कालीन परिस्थितीचा सामना करताना शेतकर्यांनी सलग पीक पद्धतीपेक्षा आंतर पीक पद्धतीचा अवलंब करावा.कारण पेरणी पुरता पाऊस चांगला झालेला असला तरी पीक वाढीच्या काळात चांगला पाऊस पडेलच याची खात्री देता येत नाही. त्यामुळे आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. संपूर्ण खरीप हंगामात विभागून चांगला पाऊस आला तर दोन्ही पिकांचे उत्पादन चांगले मिळते आणि आर्थिक फायदा होतो. आंतरपीक पद्धतीमध्ये तूर पिकात भुईमूग ,सोयाबीन,उडीद, मूग बाजरी अथवा सुर्यफुल अशा वेगवेगळ्या आंतरपिकांची निवड करता येईल.पाऊस वेळेवर झाल्यास तुरीतील आंतरपिकास मर्यादा येत नाहीत,पण पाऊस वेळेवर न येता उशिरा आला ते मात्र मूग,उडीद,सोयाबीन सारखी आंतरपिके घेता येत नाहीत. शेतकऱ्यांजवळ मग तुरीतील आंतरपिकासाठी बाजरी आणि सूर्यफुल या दोन पिकांचाच पर्याय शिल्लक राहतो आणि अगदीच पाऊस लांबला ते तूर सूर्यफुल आंतरपीक पद्धती सगळ्यात जास्त उत्पादन देऊन जाते.

# मोसंबी फळगळीची विविध कारणे आणि उपाय

मोसंबीच्या अंबिया बहाराची फळगळ ही एक मोठी समस्या मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसमोर मागील अनेक वर्षांपासून निर्माण झाली आहे. ही फळगळ होण्याची विविध कारणे आणि त्यावरील उपाय लक्षात घेतले तर शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबविणे शक्य आहे.

मोसंबी फळगळ होण्याची कारणे : आंतरिक फळगळ - पावसाळ्यात जमिनीत सतत पाणी साचून राहल्याने झाडाच्या मुळ्यां कुजतात, मुळ्यांना प्राणवायू अल्प किंवा मिळत नसल्याने फळांवर त्यांचा परिणाम होऊन ती पिवळी होऊन गळून पडतात.बुरशीजन्य फळगळ - बुरशीजन्य फळगळ प्रामुख्याने फायटोप्थोरा, कोलेटोट्रीकम, डिप्लोडिआ व ऑल्टरनेरिया या बुरशीमुळे होते. या बुरशीचे संक्रमण फळांवर होऊन आर्थिक नुकसानकारक फळगळ आढळून येते.

किटकजन्य फळगळ - फळझाडांवर प्रादुर्भाव करणाऱ्या फळमाशी तसेच रस शोषक पतंगामुळे फळगळ दिसून येते.

एकात्मिक व्यवस्थापन : शेतातील पाणी बाहेर काढावे, पाणी साचून राहिल्यास बागेमध्ये तणनाशकाचा वापर टाळावा. गळून पडलेल्या फळांना खोल खड्यात दाबून त्यांची विल्हेवाट लावावी. एनएए १ ग्रॅम (१० पीपीएम) किंवा २-४ डी १.५ ग्रॅम (१५ पीपीएम) किंवा जिब्रेलिक ॲसिड १.५ ग्रॅम (१५ पीपीएम) सह एन एटीसीए (१० पीएम) १ ग्रॅम + ब्रासिनोलाइड (४ पीपीएम) ०.४ ग्रॅम + फॉलिक ॲसिड (१०० पीपीएम) १० ग्रॅम + १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून १५ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. सूक्ष्म अन्नद्रव्ये झिंक सल्फेट ५ ग्रॅम, फेरस सल्फेट १ ग्रॅम व बोरॉन १ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन अंबिया फळांकरिता ऑगस्ट- सप्टेंबर महिन्यात तसेच मृगाच्या फळाकरिता ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये फवारणी करावी.



बुरशीजन्यरोगापासून होणारी फळगळ व्यवस्थापन : फायटोफ्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज ब्राऊन रॉट' चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फोसिटिल एएल'' २.५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. तसेच या द्रावणांची फवारणी करीत असताना वाफ्यात सुद्धा यांची जमिनीवर फवारणी करावी. बुरशीनाशकाचे द्रावण टाकल्या नंतर ५ दिवसांनी १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व १०० ग्रॅम सुडोमोनास १ किलो शेणखतात मिसळून प्रति झाड देण्यात यावे. कोलेटोट्रीकम बुरशीजन्य फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी २.५ ग्रॅम किंवा अझोक्सस्ट्रोबिन + डायफेनकोणाझोल १ मिलि प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

किटकजन्य फळगळ व्यवस्थापन : फळ हिरव्या रंगामधून पिवळसर रंगामध्ये रूपांतर होत असताना १०-१५ दिवसाच्या अंतराने फळ तोडणी होईपर्यंत ५ टक्के निंबोळी अर्क (५०० ग्रॅम/१० लिटर पाणी) किंवा निंबोळी तेल (नीम ऑइल) १० मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळमाशीच्या नरांना आकर्षित करण्याकरिता फळमाशी सापळे प्रति हेक्टरी २५ याप्रमाणात ऑगस्ट महिन्याच्या दुसर्या आठवड्यापासून किंवा तोडणीच्या साधारण २ महिने आधीपासून बागेत झाडांवर टांगून ठेवावेत.

साधारणतः सायंकाळीच्या वेळी बागेच्या बांधावर गवत पेटवून धूर करावा. रसशोषण करणाऱ्या पतंगाकरिता विषारी आमिषे तयार करुन बागेत ठेवावे. याकरिता २० ग्रॅम मॅलॅथिऑन ५० ईसी २० मिली + २०० ग्रॅम गूळ + खाली पडलेल्या फळांचा रस (४०० ते ५०० मिलि) २ लिटर पाण्यात मिसळून प्रत्येकी दोन आमिषे रूंद तोंडाच्या पसरट भांड्यात टाकून २५ ते ३० झाडामध्ये १ याप्रमाणे लटकुन ठेवावेत.

# आता खत तुटवडा कायमचा मिटणार

नवी दिल्ली / प्रतिनिधी

अमेरिका - इराण युद्धामुळे खतांचा पुरवठा विस्कळीत झाला असताना, भारताने युद्धपातळीवर उपाय शोधला आहे. भारताने रशियासोबतचा २० हजार कोटी रुपयांचा संयुक्त युरिया प्रकल्प फास्ट-ट्रॅकवर आणला आहे. रशियातील हा प्रकल्प येत्या दोन वर्षांत कार्यान्वित होण्याची शक्यता असून, भारताची खतांसाठीची परदेशावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे.

भारताच्या तीन प्रमुख कंपन्या आणि रशियाची युरालकेम यांच्या संयुक्त विद्यमाने रशियातील समारा येथील तोग्लियात्ती येथे हा प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पाची वार्षिक उत्पादन क्षमता २० लाख टन इतकी असेल. भारताच्या खत मंत्रालयांतर्गत असलेल्या इंडियन पोटॅश लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक पी. एस. गेहलोत यांनी माहिती दिली की, ‘‘हा युरिया प्लांट पुढील दोन वर्षांत तयार होईल.‘‘ भारतीय शेती प्रामुख्याने नायट्रोजनयुक्त युरियावर अवलंबून आहे. सध्या अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे युरियाचा तुटवडा निर्माण झाला आहे. भारत दरवर्षी सुमारे ३०० लाख मेट्रिक टन युरियाचे उत्पादन करतो, तर आपली गरज ४०० लाख मेट्रिक टन आहे. ही तूट भरून काढण्यासाठी भारत ७१% युरिया मध्य पूर्वेतील देशांकडून आयात करतो. मात्र, हॉर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी झाल्यामुळे गॅस आणि खतांच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे.डिसेंबर २०२५ मध्ये रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भारत भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत या संदर्भात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या. आता रशियातील प्रकल्पासाठी इंडियन पोटॅश लिमिटेड, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड आणि नॅशनल फर्टिलायझर्स लिमिटेड या तीन सरकारी कंपन्या मिळून १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करत आहेत. उर्वरित १० हजार कोटी रुपये रशियाची युरालकेम कंपनी गुंतवणार आहे. सार्वजनिक क्षेत्रातील प्रोजेक्ट्स अँड डेव्हलपमेंट इंडिया लिमिटेड या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून काम करत असून, त्यांनी आपला पूर्व-व्यवहार्यता अहवाल सादर केला आहे.

# जायकवाडीच्या पाण्यासाठी शेतकरी काढणार जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा

## शेतीला हक्काचे पाणी द्या, नदीजोड प्रकल्पाची मागणी

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी द्यावे व गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प तात्काळ करावा यासाठी जिल्ह्यातील शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढणार आहेत. लोकलढा आंदोलनच्या मादळमोही येथील बैठकीत शेतकऱ्यांनी हा निर्णय घेतला.



बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना सातत्याने दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागते. बीड जिल्ह्यात दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ पडतो तसेच पावसाचे प्रमाणही कमी आहे, यामुळे शेतकऱ्यांना सातत्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. महाराष्ट्रात व विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात शेतीसाठी पाण्याच्या सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेती जायकवाडी धरणाच्या हक्काच्या पाण्यापासून वंचित आहे. शेतीला उन्हाळ्यात पाणी मिळत नसल्याने ऊस, भाजीपाला, फळबागा आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यामुळे बीड जिल्ह्यातील शेती सातत्याने तोट्यात जाऊन शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जबाजारीपणा यासह इतर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी शेतीला जायकवाडी धरणाचे व कृष्णा खोऱ्याचे हक्काचे पाणी मिळाले पाहिजे तसेच बीड जिल्ह्यात नदीजोड प्रकल्प प्राधान्याने होणे गरजेचे आहे. त्यासाठी गेल्या दोन वर्षापासून लोकलढा आंदोलन वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करीत आहे.

या आंदोलनातील शेतकऱ्यांची बैठक गेवराई तालुक्यातील मादळमोही येथील संत जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान येथे पार पडली. या बैठकीस लोकलढा आंदोलनातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत लोकलढा आंदोलनाचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरवण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने १६८ टीएमसी चा नदीजोड प्रकल्प करण्यात येत आहे. या प्रकल्पातून बीड जिल्ह्याला किती पाणी देणार तसेच नदीजोड प्रकल्प करण्यासाठी सर्वेक्षण करण्याची मागणी या बैठकीत करण्यात आली. या मागण्यांसाठी येत्या २५ मे सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकर्यांचा बैलगाडी मोर्चा काढण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. बीड जिल्ह्यातील दुष्काळ दूर करून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद फुलविण्यासाठी शासनाने शेती सिंचनाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा अशी मागणी ही बैठकीत करण्यात आली. या बैठकीसाठी लोकलढा आंदोलनातील ज्येष्ठ व तरुण शेतकरी, समन्वयक उपस्थित होते.

# स्वगणना मोहिमेत नागरिकांनी सहभाग नोंदवावा -मुख्याधिकारी इंगोले

परतुर। प्रतिनिधी

भारत सरकारच्या वतीने जनगणना २०२७ ची प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबवण्यात येत असून, महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यातील घरयादी व घरगणना प्रक्रियेदरम्यान नागरिकांसाठी ''स्व-गणना'' ही अभिनव सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती परतुर मुख्याधिकारी दीपक इंगोले यांनी दिली. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी, अचूक नियोजनासाठी आणि भविष्यातील घोरणनिर्मितीसाठी जनगणना अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील स्व-गणना मोहीम १ मे ते १५ मे या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानात नागरिकांनी घरी बसून ऑनलाइन पद्धतीने उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन परतुर तहसीलदार यांनी केले आहे. आमची जनगणना, आमचा विकास'' या संकल्पनेतून प्रत्येक नागरिकाने स्वतःहून स्व-गणना प्रक्रियेत सहभागी होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी स्वतःची, कुटुंबाची माहिती अचूकपणे नोंदविल्यास शासनाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, उद्योग, परिवहन, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा यांसारख्या विविध क्षेत्रांसाठी योग्य योजना आखण्यास मोठी मदत होणार आहे. आपण भरलेले माहिती हे गोपनीय व सुरक्षित राहिल.नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळ ला भेट द्यावी. त्यानंतर मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातून ओटीपी द्वारे लॉग-इन करून राज्य, जिल्हा व स्थानिक तपशील निवडावेत. डिजिटल नकाशावर स्वतःच्या घराचे स्थान चिन्हांकित करून घर व कुटुंबाशी संबंधित ३४ प्रश्नांची माहिती भरून अर्ज सादर करावा. अर्ज यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना एसइआयडी प्राप्त होईल. सदरील मिळालेला एसइआयडी हे क्रमांक सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. १५ मे ते १४ जून या दरम्यान प्रत्यक्ष प्रगणक आपल्या घरी घर गणना करण्यासाठी येतील तेव्हा त्यांना हा एसइआयडी क्रमांक दाखवावा. प्रगणक आपण दिलेल्या आयडी वरुन घर गणना करतील. आवश्यक वाटल्यास आयडी मधील भरलेल्या माहितीची खात्री करतील. नागरिकांनी दिलेली सर्व माहिती ती केवळ पूर्णपणे गोपनीय आणि सुरक्षित ठेवण्यात येणार असून ती के शासकीय कामकाजासाठीच वापरण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मुख्याधिकारी परतुर व तहसील प्रशासनाच्या वतीने नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्रपरिवाराला तसेच सामाजिक माध्यमे, व्हॉट्सअँप गट, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि युवक मंडळांच्या माध्यमातून जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. देशाच्या प्रगतीचा, विकासाचा आणि समृद्धीचा पाया मजबूत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दरम्यान स्व-गणनेत सहभागी होऊन राष्ट्रनिर्मितीच्या या महत्त्वपूर्ण लोकोत्सवात योगदान द्यावे, असे आवाहन मुख्याधिकारी यांनी केले.

# मुंगूसवाडेत हॉटेल मालकावर गोळीबार करून हत्येचा प्रयत्न करणाऱ्या कुख्यात गुंडाला बेड्या

## गुंड परश्या गायकवाड,करण जाधव,विठ्ठल लष्करे याची पाथर्डीत दहशत मकोका अंतर्गत कारवाईची मागणी !

पाथर्डी । प्रतिनिधी

मुंगूसवाडे शिवारातील हॉटेल मैत्री चे मालक शक्तिमान महादेव खेडकर यांच्यावर जुन्या वादातून गावठी कट्ट्यातून गोळीबार करून आणि कोयत्याने वार करून हत्येचा प्रयत्न करणाऱ्या टोळीतील मुख्य सूत्रधाराला पाथर्डी पोलिसांनी थरारक पाठलाग करून अवघ्या एका तासात जेरबंद केले बुधवारी फिर्यादी शक्तिमान खेडकर हे आपल्या हॉटेलवर असताना आरोपी परशुराम मोहन गायकवाड करण भरत जाधव विठ्ठल सखाराम लष्करे व त्यांचे इतर दोन अनोळखी साथीदार स्कॉर्पिओ आणि ब्रेझा गाडीतून तेथे आले यावेळी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ व दमदाटी केली विठ्ठल लष्करे याने फिर्यादी जवळ जाऊन तुला खूप जास्त झाले आहे तुझा काटाच काढतो असे म्हणून खेडकर यांना ठार मारण्याच्या उद्देशाने पिस्तुलातून गोळी झाडण्याचा प्रयत्न केला मात्र गोळी अडकल्याने त्याने परशा गोळी अडकली फायर होईना असे म्हणताच गुंड परश्या गायकवाड याने त्याच्या हातातील कोयत्याने शक्ती खेडकर यांच्या गळ्यावर जीवघेणा वार केला शक्ती खेडकर यानी तो वार चुकवून तेथून पळ काढल्याने मोठा अनर्थ टळला त्यानंतर या टोळीने हॉटेलमधील टेबल खुर्च्या फ्रिज आणि काऊंटरची तोडफोड करून नुकसान केले आणि गल्ल्यातील पाच हजार रुपये काढून घेऊन गाडीतून फरार झाले फिर्यादी शक्ती खेडकर याने तातडीने डायल ११२ वर संपर्क साधून माहिती दिल्यावर पोलीस यंत्रणा सतर्क झाली जिल्हा पोलीस अधीक्षक मुक्कमा सुदर्शन अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पुजारी पोलीस उपनिरीक्षक विशाल लहाने सहाय्यक फौजदार नितीन दराडे पोलीस कर्मचारी सागर बुधवंत बाबासाहेब बडे ज्ञानेश्वर इलग संजय जाधव आणि इजाज सय्यद यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली पोलिसांनी अत्यंत वेगाने तपासाची चक्रे फिरवत गुंड विठ्ठल लष्करे याचा पाठलाग करून त्याला मुसक्या आवळल्या त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेला एक गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत गुन्ह्यातील इतर फरार गुंड आरोपींच्या परशा गायकवाड करण जाधव यांच्या शोधासाठी दोन स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली असून पाथर्डी पोलिसांनी केवळ एका तासात केलेल्या या धडाकेबाज कारवाईमुळे गुन्हेगारी वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.



### पाथर्डी तालुक्यात भीतीचे वातावरण

मूळचा एकनाथवाडी गावचा असलेला आणि बीड येथे वास्तव्यास असलेला गुंड परश्या गायकवाड हा आपल्या साथीदारांसह पाथर्डी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून दहशत माजवत असल्याचे निदर्शनास आले आहे मिडसांगवी येथील यात्रेत सुद्धा गुंड परश्या गायकवाड याने गावठी कट्ट्यातून गोळीबार करून दहशत निर्माण केली होती बीड जिल्ह्यासह पाथर्डी तालुक्यात अनेक गावात चोऱ्या दरोडे टोळी युद्ध करणे रोड रॉबरी करून खून करणे असे गंभीर गुन्हे गुंड परश्या गायकवाड याच्यावर दाखल आहेत यामुळे बीड जिल्ह्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात परशा गायकवाड यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# भूमीअभिलेख कार्यालयातील मोरे,सावळे व पुसदकर जमीन मोजणी प्रकरणात निलंबन त्रिकालबाधित सत्य!

## भालगाव येथील पांडुरंग घुले शेतजमिनीत अतिक्रमण आणि मोजणी फेरफार प्रकरण

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील पीडित शेतकरी पांडुरंग मायनजी घुले व त्यांचे दोन मुलं हरी पांडुरंग घुले वसंत पांडुरंग घुले या बंधूंच्या शेतजमीन गट नंबर ४२४ ४२५ व ३९१ शेतजमिनीत (वहिवाट आणि बांध ) सामनेवाले एकनाथ घुले यांच्यात शेतजमीनमोजणी वरून वाद आहे यासंदर्भात पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपअधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर सुनील साळवे यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वसंत घुले आणि हरी घुले यांच्या शेतजमिनीमध्ये एकनाथ घुले यांनी वहिवाटीत अतिक्रमण केले असल्याची तक्रार थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती.

त्याअनुषंगाने बनावट दस्तावेज तयार करून मोजणीत फेरफार केल्याप्रकरणी पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन कर्मचारी निखिल मोरे व विद्यमान कर्मचारी दिनेश पुसदकर व सुनील सावळे यांचे निलंबन करण्याची मागणी होती त्या अनुषंगाने जिल्हा भूमीअभिलेख अधीक्षक संजय कुंभार यांनी चौकशी समिती नेमून चौकशी समितीचे प्रमुख संदीप गोसावी यांच्या समितीने मोरे साळवे आणि पुसदकर यांच्यावरील आरोप सिद्ध करून अहवाल पूर्ण केला आहे या अनुषंगाने सदरील प्रकरणातील आरोप सिद्ध झालेले कर्मचारी मोरे साळवे पुसदकर यांना नोटीस पाठवून खुलासा मागवला जाईल व अंतिम निलंबनाची कारवाई भुमिअभिलेख नाशिक अधीक्षक अभियंता महेश इंगळे हे करतील असे ठाम मत अहिल्यानगर भूमीअभिलेख अधीक्षक संजय कुंभार यांनी व्यक्त केले आहे.

> पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपाधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने भालगाव येथील शेतकरी पांडुरंग मायनजी घुले त्यांचे मुलं वसंत घुले व हरी घुले यांच्या शेतजमीन गटनंबर ३९१ ४२४ व ४२५ जमीन मोजणीमध्ये २०/१२/२०२४ २०/०६/२०२५ तारखेला केलेल्या हद्दीखुणा २०/३/२०२६ रोजी केलेल्या हद्दीखुणा गट नंबर ३९१ मध्ये कायम मोजणी सीट व पोटहिस्सा यामध्ये सुद्धा प्रचंड तफावत जाणवत असल्याचे सिद्ध झाले आहे तसा अहवाल पूर्ण केला आहे यामुळे मोरे पुसदकर व साळवे यांच्यावर निलंबन कारवाई अटळ आहे.
>
> (संजय कुंभार-जिल्हाअधीक्षक भूमीअभिलेख कार्यालय अहिल्यानगर)

# जामखेड नगरपरिषदेतील लाचप्रकरणावरून राजकारण तापले

## ही तर केवळ 'चिंगळी', 'शार्क मासा' बाहेरच - रोहित पवार यांचा भाजपवर निशाणा

जामखेड: जामखेड नगरपरिषदेत जन्मदाखल्यासाठी ३ हजार रुपयांची लाच घेताना लिपिक व मदतनीसाला रंगेहात पकडल्यानंतर आता या प्रकरणावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी या कारवाईवरून सत्ताधारी भाजपवर जोरदार हल्ला चढवत गंभीर आरोप केले आहेत.

जामखेड नगरपरिषदेतील जन्म-मृत्यू विभागाचा लिपिक अभिजीत भैसडे आणि मदतनीस अहमद शेख यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ३ हजार रुपयांची लाच घेताना पकडले. या घटनेनंतर सोशल मीडियाद्वारे आपली प्रतिक्रिया देताना रोहित पवार म्हणाले की, ''भाजपाच्या ताब्यात असलेल्या जामखेड नगरपरिषदेतील भ्रष्ट कारभाराचा एसीबीने आज जाहीर पंचनामा केला आहे. मात्र, ज्यांच्यावर कारवाई झाली ते केवळ छोटे मासे (चिंगळ्या) आहेत. रोहित पवार यांनी पुढे खळबळजनक दावा केला की, नगरपरिषद प्रशासनातील भ्रष्टाचारातील सर्वात मोठा 'शार्क मासा' सर्वांना माहीत असूनही तो अद्याप नामानिराळा आहे. या मोठ्या माशाला कारवाईच्या जाळ्यात अडकवून बाहेर काढण्याची गरज आहे, तरच बाकीच्या 'चिंगळ्या' नीट काम करतील आणि जामखेडकरांची भ्रष्टाचारातून सुटका होईल. विशेष म्हणजे, या 'शार्क माशाला' मुदतवाढ देण्याचा सत्ताधारी भाजपचा प्रयत्न असून तो यशस्वी होऊ न देता हाणून पाडला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. एकीकडे एसीबीच्या कारवाईमुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडालेली असतानाच, दुसरीकडे रोहित पवार यांच्या या विधानामुळे नगरपरिषदेतील 'तो' मोठा मासा नक्की कोण? या चर्चांना उधाण आले आहे. या लाच प्रकरणामुळे जामखेडमधील सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले असून आगामी काळात हे प्रकरण अधिक गाजण्याची शक्यता आहे.



# जिल्हाधिकारी यांनी घेतली मर्चंट बँक गैरव्यवहार संबंधी बैठक

## नियमाप्रमाणे सगळ्याचे पैसे मिळणार; ठेवीदारांनी घाबरून जावू नये-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना

जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील गैरव्यवहारावर जिल्हा प्रशासन सर्व परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. तसेच बँकेतील ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत सर्वतोपरी प्रयत्न केले जात असुन, ठेवीदारांनी घाबरुन जावू नये असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आवाहन केले आहे.जालना मर्चंट कोऑपरेटिव्ह बँकेतील झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आज महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी बैठकीस जिल्हा उपनिबंधक , संजय बोराडे, जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँके मुख्य कार्यकारी अधिकारी कांचन केळकर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, बँकेचे प्रतिनिधी तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील ठेवीदारांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी काटेकोर उपाययोजना राबविण्याचे देखील निर्देश देण्यात आले. याबाबत ठेवीदारांनी अफवांवर विश्वास न ठेवता, अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.



बैठकीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. केळकर यांनी बँकेच्या सध्याच्या स्थितीबाबत माहिती देताना सांगितले की, बँकेच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू असून, यासंदर्भात १ एप्रिल, २०२६ रोजी प्राथमिक माहिती देण्यात आली आहे. तसेच, छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी सहकारी बँकेमार्फत बँकेचे ऑडिट व कागदपत्रांची तपासणी प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, सद्या बँकेकडे सुमारे १७३ कोटी रुपयांच्या ठेवी असून, त्यापैकी सुमारे १२७ कोटी रुपये कर्जरूपाने वितरित करण्यात आले आहेत. याशिवाय बँकेचे स्वतःचे भांडवल, इतर बँकांमधील गुंतवणूक आणि शासकीय रोख्यांमधील गुंतवणूक मिळून सुमारे ७५ कोटी रुपयांची रक्कम बँकेकडे उपलब्ध आहे. बँकेचे एकूण सुमारे ५० हजार खातेदार असून, त्यापैकी ४९ हजारांहून अधिक खातेदारांना ठेवी विमा योजनेअंतर्गत लाभ मिळण्याची शक्यता आहे. सद्या विविध शाखांमध्ये विमा दावा फॉर्म संकलन व सादरीकरणाची प्रक्रिया सुरू आहे. उपलब्ध माहितीनुसार, पात्र ठेवीदारांच्या खात्यात विमा रक्कम जुलै २०२६ पर्यंत जमा होण्याची शक्यता असल्याची माहिती ही श्री. केळकर यांनी यावेळी दिली. यावेळी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल व जिल्हा उपनिबंधक यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, कोणही घाबरून न जाता शांतता राखावी. बँक शाखांमध्ये केवळ विमा दावा फॉर्म सादर करण्यासाठीच भेट द्यावी. ठेवीदारांनी अफवांवर विश्वास न ठेवता बँकेस सहकार्य करावे, असे आवाहन केले. डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन म्हणजे काय ? ठेवीदारांच्या सुरक्षेसाठी कार्यरत डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ही रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची उपकंपनी आहे.

१५ जुलै १९७८ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेमार्फत बँक बंद पडल्यास किंवा तिचा परवाना रद्द झाल्यास प्रत्येक खातेदाराला बचत, चालू, मुदत व आवर्ती ठेवींवर कमाल ५ लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण दिले जाते. हा विमा सर्व व्यावसायिक, प्रादेशिक ग्रामीण तसेच सहकारी बँकांना लागू असून, यासाठीचा प्रिमियम खातेदारांकडून न आकारता संबंधित बँकांकडून भरला जातो.

बँक अडचणीत आल्यास मार्फत साधारण ९० दिवसांच्या आत दावा प्रक्रिया पूर्ण करून पात्र ठेवीदारांना रक्कम दिली जाते, ज्यामुळे ठेवीदारांचे आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होते अशी माहिती जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगश केदार यांनी दिली.

# वडांच्या झाडांसाठी पाणीपुरवठा करण्याचे शिवाजी पालवे यांचे आवाहन



पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भगवानगडाच्या डोंगरावर जय हिंद फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष माजी सैनिक व वृक्षमित्र कोल्हार येथील शिवाजीराव पालवे यांच्या संकल्पनेतून १०० वडांचे झाड जुलै २०२६ मध्ये प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांच्या हस्ते लावली गेली होती.

परंतु आता ऐन उन्हाळयात पाण्याअभावी वडांची झाड कोमेजून जाऊ लागले आहेत यामुळे वृक्षमित्र शिवाजीराव पालवे यांनी स्वखर्चातून वडाच्या झाडांना पाणी देऊन नवसंजीवनी दिली आहे परंतु अजूनही पावसाळ्यापर्यंत किमान आठ ते दहा दिवसाला वडाच्या झाडांना मुबलक पाणीसाठा हवा आहे यामुळे भगवानगडाच्या दंडकारण्यात हरितक्रांती शोभून दिसावी व निसर्गाचे प्रामुख्याने दंडकारण्यातील वड पिंपळ निलगिरी आंबा लिंब खैर अशा विविध वृक्षांच्या जतन व संगोपन करण्याच्या उद्देशाने लोकसहभागातून व विविध सामाजिक संस्थेच्या तसेच पाथर्डी वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या माध्यमातून पावसाळ्यापर्यंत प्रति आठवड्याला टँकरने वडाच्या झाडांना पाणीपुरवठा करावा अशी मागणी व आव्हान वृक्षमित्र शिवाजीराव पालवे यांनी केले आहे.

# लोकहिताच्या कामात सत्ताधाऱ्यांकडून आडवणूक

## पंडित,पवार यांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यात लोकहिताच्या कामांमध्ये सत्तेत असलेल्या लोकप्रतिनिधीकडून होत असलेल्या अडवणुकीला कंटाळून मौजे जळगाव मंजरा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजपा नेते बाळराजे पवार यांचे नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.**

जळगाव मांजरा येथे झालेल्या या प्रवेश सोहळ्यास यावेळी माजी जि प सदस्य शामराव राठोड, माजी पं स उपसभापती भीष्माचार्य दाभाडे, माजी सरपंच सुभाषराव शिंदे, सरपंच सूर्यकांत शिंदे, दत्तप्रसाद जाधव, सरपंच कैलास माने, विजय डरफे, बंडू घोलप, मा. मुकुंद लांडे, सरपंच रितेश साबळे, कल्याण लांडे, माजी सरपंच महादेव खेत्रे, सरपंच नारायण गाडे, चेअरमन रमेश गायकवाड, महारुद्र खुणे, शहादेव बोबडे, विकास मीठे (फौजी), सुरेश लाखे, प्रकाश गाडे, गोकुळ घवाडे, उमेश खेत्रे, दामू मोरे आदींचे प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, आज अभिमान वाटतो की, माझ्यासोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची तिसरी पिढी आजही माझ्यासोबत काम करत आहे. मी आणि दादा मिळून आपणास येणाऱ्या प्रत्येक अडचणीवर मात



करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर असल्याचे सांगून कार्यकर्त्यांनी एक जीवाने गावाच्या माणसाच्या विकासासाठी आणि भल्यासाठी काम करावे तुमच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे. तुमचे कोणतेही काम अडवले जाणार नाही जर कोणी अडवत असेल तर त्याची माझ्याशी गाठ असेल असा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला. बाळराजे पवार म्हणाले की, जळगाव मांजरा हे गाव मी व आबांनी आजच दत्तक घेतले. या गावातील गावकऱ्यांच्या समस्या आम्ही जातीने लक्ष घालून सोडवू.रेशमांच्या धाग्यांनी श्रीमंतीचं स्वप्न साकारणार जळगाव मंजरा हे गाव. या गावातील तरुणांनी आपला स्टेटस बनवण्यासाठी कष्ट घ्यावेत. आपल्या कष्टावर मौज करणाऱ्या नेत्यांना आजच्या तरुणांनी लवकरच ओळखले पाहिजे. आपले प्रश्न सोडवण्यासाठी मी सदैव कटिबद्ध असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिट्ठी देऊन पंडित जिजा ईदगे, अनंतराव आंडिल, महारुद्र खुणे, गोविंद खुणे, श्याम इदगे, शहादेव बोबडे, राजाभाऊ इदगे, भाऊसाहेब जामकर, विठ्ठल खुणे, शहाजी इदगे, बापू ईकर, महादेव खुणे, दत्ता खुणे, झुंबर इदगे, दामोदर इदगे, संदिपान इदगे, संजय बोबडे, केशव इदगे, छत्रभुज इदगे, दादा इदगे, बदाम इदगे, ज्ञानेश्वर इदगे, माऊली जामकर, माऊली बोबडे, सुभाष इदगे, आनंद कांबळे, शहादेव खुणे, माऊली खुणे, रुस्तुम इदगे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी गावकऱ्यांसह पंचक्रोशीतील भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मारहाणप्रकरणी गेवराई न्यायालयाचा मोठा निकाल आरोपीला ३ वर्षे कारावास आणि २५ हजार रुपये दंड

**गेवराई । प्रतिनिधी**

मारहाणीतून गंभीर दुखापत केल्याच्या २०१६ मधील एका जुन्या प्रकरणात गेवराई येथील प्रथमवर्ग न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून ३ वर्षे सश्रम कारावास आणि २५,००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

गेवराई तालुक्यातील लुखामसला येथील फिर्यादी सुमन सुंदर पवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून २०१६ मध्ये गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं. ३११/२०१६) दाखल करण्यात आला होता. आरोपी शामसुंदर गुणाजी शिंदे (वय ३४, रा. लुखामसला) याच्यावर भारतीय दंड विधानाच्या कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६, ५०९ आणि ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला होता.

हे प्रकरण गेल्या अनेक वर्षांपासून न्यायालयात प्रलंबित होते. प्रथमवर्ग न्यायमूर्ती श्री. आर. ए. मिसाळ यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सरकारी पक्षाने मांडलेले पुरावे आणि साक्ष ग्राह्य धरून, न्यायालयाने आरोपीने गुन्हा केल्याचे सिद्ध झाल्याचे नमूद केले. त्यानुसार आरोपी शामसुंदर शिंदे याला कलम ३२५ (गंभीर दुखापत करणे) आणि ५०९ (स्त्रीच्या विनयशीलतेचा अपमान करणे) अंतर्गत दोषी ठरवून ३ वर्षे कारावास व २५,००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली.


बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केला. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन तपासी अंमलदार एस. व्ही. घाणे यांनी केला होता. न्यायालयात सरकारी अभियोक्ता म्हणून एस. के. माने यांनी काम पाहिले, तर कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोह/१३४३ व्हि. डी. म्हेत्रे आणि पोकॉ/३९२ डी. आर. ढाकणे यांनी सहकार्य केले. पिडीतेस न्याय मिळाल्याने परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.

# उष्णतेने होरपळणाऱ्या पाटोद्याला महावितरणचा 'शॉक'

## वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक आक्रमक

पाटोदा । प्रतिनिधी

सध्या पाटोदा शहर आणि तालुक्यात उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून तापमानाचा पारा ४३ ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. निसर्गाच्या या कोपामुळे नागरिक आधीच हैराण असताना, त्यातच महावितरणच्या लहरी कारभारामुळे पाटोदेकरांचे जगणे कठीण झाले आहे. दिवसातून ६ ते १० वेळा वीज खंडित होत असल्याने जनतेमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.दैनंदिन जीवन विस्कळीत, विद्यार्थ्यांचे नुकसानसततच्या 'लाईट गुल' होण्यामुळे तालुक्यातील जनजीवन पूर्णपणे



कोलमडले आहे. उकाड्यामुळे पंखे, कुलर आणि एसी बंद पडत असल्याने नागरिकांचा जीव कासावीस होत आहे. विशेषतः विद्यार्थी आणि लहान मुलांचे हाल होत आहेत. परीक्षेच्या काळात रात्रीच्या वेळी वीज नसल्याने अभ्यास कसा करायचा, असा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर उभा ठाकला आहे.व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान आणि आरोग्याचा धोकावीज नसल्यामुळे व्यापाऱ्यांच्या व्यवसायावरही मोठा परिणाम झाला आहे. फ्रिजमधील दूध, शीतपेये आणि इतर नाशवंत माल खराब होत असल्याने मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. दुसरीकडे, वीज नसल्याने परिसरात डासांचे प्रमाण वाढले असून डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा धोका बळावला आहे.नागरिकांच्या प्रमुख तक्रारी आणि मागण्या:वीजपुरवठा सुरळीत करा: वारंवार होणारे ट्रिपिंग थांबवून अखंडित वीज द्यावी.नियोजन जाहीर ◀◀ पान ३ वर

# पाच लाख रुपये मिळवून देण्यात ॲड. किशोर खेडकर यांना यश

बीड । प्रतिनिधी

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कायदेशीर लढा उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. अशाच एका सायबर गुन्ह्याच्या फिर्यादीस मा.०६ वे मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय बीड यांनी दी ०२/०४/२०२६ रोजी सदरील की.फो क्र : २४५/२०२६ प्रकरणात ॲड. किशोर खेडकर यांनी फिर्यादीची बाजू सक्षमपणे मांडत न्यायालयातून पाच लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिली आहे.



सदर प्रकरणात फिर्यादीची ऑनलाईन फसवणूक होऊन आर्थिक नुकसान झाले होते. तपासा दरम्यान व न्यायालयीन प्रक्रियेत ॲड. किशोर खेडकर यांनी सखोल अभ्यास, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदींचा योग्य वापर करत फिर्यादीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी युक्तिवाद केला. परिणामी, न्यायालयाने आरोपींकडून फिर्यादीस पाच लाख रुपये देण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे सायबर गुन्ह्यांबाबत जनतेमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होणार असून पीडितांना कायदेशीर मार्गाने दिलासा मिळू शकतो, हे अधोरेखित झाले आहे. ॲड. किशोर खेडकर यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल कायदेशीर क्षेत्रातून कौतुक होत आहे.



# गंगामसला येथे शेकापचे दोन दिवसापासून धरणे आंदोलन

माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील गंगामसला येथील गट नंबर २४ मध्ये गेल्या दोन दिवसापासून शेकापचे धरणे आंदोलन सुरू आहे. बीड जिल्ह्याला पिक विमा तात्काळ मंजूर करा, रसायनिक खताचे वाढत्या किमती तात्काळ कमी करा या मागण्यासाठी हे धरणे ◀◀ पान ३ वर

# पर्यावरणास हाणी पोहचवणारा सरस्वती नदीवरील सिमेंटीकरणाचा प्रस्ताव रद्द करा -वर्षाताई जोशी

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातुन वाहत असलेल्या सरस्वती नदीचे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या धार्मिक इतिहासात मोठे महत्व असुन या नदीच्या अस्तित्वामुळेच परळीला पाण्यावरची परळी अशी ओळख आहे.परळी नगरपालिकेने या नदीचे क्रॉंक्रिटीकरण करुन अस्तित्वच संपवण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे.यामुळे धार्मिक ठेवा



तर नष्ट होणारच आहे परंतु पर्यावरणाची मोठी हाणी होणार असल्याने हा प्रकल्प रद्द करुन पर्यावरणपूरक प्रकल्प राबवावा अशी मागणी भाजपा शहर उपाध्यक्षा सौ.वर्षाताई जोशी यांनी केली आहे. याबाबत नगरपालिका ◀◀ पान ३ वर

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात बारावी वाणिज्य शाखेत सक्षम शर्मा पहिला

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माजलगाव येथील सुदरराव महाविद्यालयात २०२५-२६ या चालू शिक्षणीक वर्षाच्या १२ वी वाणिज्य शाखांच्या परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यात माजलगाव चे प्रतिष्ठित व्यापारी मनोज शर्मा यांचा मुलगा सक्षम शर्मा याने महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला त्यांने (८२.१७)% मार्क मिळाले आहेत.



या यशा बद्दल म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके,यांच्यासह विकास समिती सदस्य ॲड.भानुदासराव डक,सुरेंद्र रेदासनी प्राचार्य डॉ.जी. के.सानप,प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के. मुळे,उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे,पर्यवेक्षक महादेव अलझेंडे ,स्वप्निल टाक यांनी अभिनंदन केले. प्राचार्य व शिक्षकांनी व व्यापारी वर्गातुन सक्षम चे विशेष कौतुक केले जात आहे सुप्रभात ग्रुपचे सदस्य बाळु मालपाणी,गोंविद भंडारी,वैजेनाथ घायतिडक गोपाल मानधने,राजु रत्नपारखी,अमित श्रीश्रीमाळ,पवन मुंदडा,मनोज मानधने,गणेश लोहिया व सर्व स्तरातून सदस्य अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# किसन उबाळे पीएसआय म्हणजे परिवाराचा उद्धार- गणेश उगले

बीड । प्रतिनिधी

बीड प्रतिनिधी- सन २०१३ मध्ये वडील अनिल काका उबाळे यांचे छत्र हरवल्यानंतर घरातील आई चुलते व मामा यांच्या यांच्या आशीर्वादाने व वडिलांनी शिकवलेल्या जीवनातील धड्यामुळे २०१४ मध्ये पोलीस झालेला आणि २०२१ मध्ये फक्त २ मार्कांनी पीएसआय चे संधी हुकलेला पण ती संधी २०२५ मध्ये अव्वल क्रमांकाने मिळवली हा किसन उबाळे यांचा प्रवास अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत असताना सुद्धा खडतर प्रवासाचा पण आभाळाला गवसणी घालणार




आहे. वडिलांचे श्राद्ध व्हायच्या अगोदर एक बहीण वन खात्यात आणि आणि किसन पोलीस खात्यात भरती झाले हे फक्त मेहनतीमुळे शक्य झाले. घरातील कुटुंबाची जबाबदारी सांभाळून आणि प्रसंगी सायकलवर सुद्धा चराटा ते बीड प्रवास करीत अल्प फी मधील पोलीस भरतीपूर्व अकॅडमी जॉईन करून किसन उबाळे हे पीएसआय झाले. खरोखरच किसन उबाळे यांनी उबाळे परिवाराचा व आपल्या जिद्दीच्या यशाचा मोठी एव्हरेस्ट शिखर पार केले आहे असे गौरव उद्गार शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा बीड मार्केट कमिटीचे संचालक गणेश बप्पा उगले यांनी समस्त गावकरी चराटा यांनी आयोजित केलेल्या पीएसआय किसन अनिल उबाळे यांच्या सत्कार प्रसंगी व्यक्त केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश उगले, बीड पंचायत समितीचे माजी उपसभापती मकरंद भाऊ उबाळे, सरपंच महादेवराव ◀◀ पान ३ वर

# तीन अपघाताच्या घटनेत तिघांचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वेगवेगळ्या ठिकाणी तीन अपघात घडले या तीन अपघातात प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला या तीनही घटना बीड तालुक्यात गुरुवारी घडल्या

पहीली घटना पिंपळनेर रोडवर अंगत पटाईत वय ४० वर्ष यांचा दोन मोटरसायकलचा अपघात झाला ही घटना गुरुवारी पहाटे घडली. असून दुसरा गंभीर जखमी असून खाजगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. तर दुसरी घटना तीर्थ वन परिसरात ट्रॅक्टरचा अपघात झाला.यात एकाचा मृत्यु झाला. आणि तिसरी अपघाताची घटना नगर रोडवर नवगण राजुरी परिसरात घडली आहे.यातही एकाचा मृत्यु झाल्याचे कळते.

आणि चौथी घटना ४० वर्षीय तरुण अटॅकने मृत्यू झाला. शिवाजी गीते हा तरुण खोकरमोहा गावचा असून त्याचे वय ४० आहे.

# शासन आपल्या दारी नव्हे, आता थेट गावपातळीवर!

## आष्टी मंडळात छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान उत्साहात; शेकडो नागरिकांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानांतर्गत आष्टी मंडळामध्ये भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट नागरिकांच्या दारी पोहोचविण्यात आला.

या अभियानात श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, ई-शिधापत्रिका आदेश, बेबी केअर किट वितरण, नगरपंचायत अंतर्गत बांधकाम परवाने, आयुष्यमान कार्ड, जन्म प्रमाणपत्र, मतदान ओळखपत्र, डिजिटल सातबारा



वितरण, रस्ता खुला बाबत सातबारावर नोंद घेणे अशा विविध सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला.

विशेष म्हणजे भटक्या-विमुक्त जमातीतील मौजे ब्रह्मगाव व मौजे मांडवा येथील लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शासनाच्या योजनांपासून कोणताही घटक वंचित राहू नये, या उद्देशाने प्रशासनाने गावपातळीवर थेट जनतेशी संवाद साधत सेवा उपलब्ध करून दिल्या.

या कार्यक्रमास युवा नेते जयदत्त भैय्या सुरेश धस, सरपंच हाजीपुर सरपंच श्री. निंबाळकर थोरवे, श्री. किशोर नाना हंबर्डे, तहसीलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार बाळ दत्त मोरे नगरपंचायत सिओ, नायब तहसीलदार अश्विनी पडोळे, मंडळ अधिकारी संजय शिंदे, पत्रकार शरद रेडेकर,ग्राम महसूल अधिकारी ज्ञानदेव अनारसे यांच्यासह तहसील कार्यालयातील कर्मचारी मोठ्या ◀◀ पान ३ वर

# भारतीय कम्युनिस्ट पक्ष बीड जिल्हा कौन्सिलच्या वतीने कार्ल मार्क्सच्या जयंती दिनी क्रांतिकारी अभिवादन

बीड । प्रतिनिधी

जगातील कामगारांनो एक व्हा या क्रांतिकारी घोषणेने एकोणिसाव्या शतकात जगभर भांडवलदारी वर्गाला हादरून टाकणाऱ्या कार्ल मार्क्स च्या साम्यवादी कृतिशील तत्त्वज्ञानाने क्रांती घडवून आणली त्या कार्ल मार्क्सचा जयंतीचे औचित्य साधून दिनांक ५ मे २६ रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष जिल्हा कौन्सिल बीड येथे पक्ष व समविचारी सामाजिक कार्यकर्त्यांनी क्रांतिकारी अभिवादन केले असल्याची माहिती पक्षाचे प्रसिद्धी प्रमुख कॉ तुकाराम पवार यांनी दिली आहे.

प्रथम कार्ल मार्क्स यांच्या प्रतिमेस महाराष्ट्र राज्य सचिव मंडळ



सदस्य कॉम्रेड नामदेव चव्हाण व संपादक कॉम्रेड शेखर कुमार यांनी पुष्पहार अर्पण केला यावेळी उपस्थितीना मार्गदर्शन करताना कॉम्रेड नामदेव चव्हाण यांनी कम्युनिस्ट पक्ष केवळ एक पक्ष नसून तो एक विचार आहे जोपर्यंत जगात गरिबी दारिद्र्य भेदभाव शोषित शोषक वर्ग अस्तित्वात आहे तोपर्यंत सत्तेत असो वा नसो कम्युनिस्ट पक्षाचअस्तित्व असणार ज्यांच्यावर अन्याय होतो ज्यांची पिळवणूक होते त्यांना कम्युनिस्ट पक्षाशिवाय दुसरा पर्याय नाही हे अधोरेखित करून सांगितले तसेच कार्ल मार्क्सची आर्थिक ◀◀ पान ३ वर


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मराठा साम्राज्याचा विस्तार दाखवणारा नकाशा एनसीईआरटीने वगळला
## राजघराण्यांची न्यायालयात धाव, जनहित याचिका दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

एनसीईआरटीच्या (छउएठढ) इयत्ता आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शवणारा नकाशा हटवण्याच्या निर्णयामुळे महाराष्ट्रात दिवसागणिक तीव्र संतापाची लाट उसळत आहे. मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाशी छेडछाड केल्याचा आरोप करत राज्यभरातून विरोधाचा आवाज उठवण्यात येत आहे. सुरुवातीला हिंदी भाषेतील पुस्तकातून हा नकाशा हटवण्यात आला होता. त्यानंतर राज्याचे शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी या संदर्भात एनसीईआरटीसोबत पत्रव्यवहार करून योग्य तो पाठपुरावा केला जाईल, असे विधानमंडळात सांगितले होते. मात्र, त्यानंतरही कोणतीही दखल न घेता आता इंग्रजी भाषेतील पुस्तकातूनही मराठा साम्राज्याचा नकाशा हटवण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, शिक्षण मंत्र्यांना एनसीईआरटीकडून अक्षरशः वाटाण्याच्या अक्षता लावल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. दरम्यान, इयत्ता आठवीच्या सामाजिक शास्त्राच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळण्याचा वाद आता थेट मुंबई उच्च न्यायालयापर्यंत जाऊन पोहचला आहे. महाराष्ट्रातील राजघराण्यांनी या संदर्भात मुंबई






उच्च न्यायालयात धाव घेतली असून पुढे कायद्याची लढाई लढण्याचा देखील पवित्रा घेण्यात आला आहे.

नागपूरच्या भोसले राजघराण्याचे वर्तमान वंशज मुधोजीराजे भोसले (ठरक्षश चींवहेक्षळ इर्हेीश्रश) यांनी सुरवातीपासूनच या विषयाबाबत आक्रमक भूमिका घेत हे प्रकरण लावून धरलं होतं. यात आता जिजाऊ घराण्याचे शिवाजी दत्तात्रय राजे जाधव आणि रायगडचे रघोजीराजे शाहाजीराजे आंग्रे याचिकाकर्ते असून यांच्या वतीने ड. आशिष गायकवाड यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. इयत्ता ८ वीच्या सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा मार्च महिन्यात गुपचुप वगळण्यात आला होता. याबाबत आक्षेप घेत एनसीईआरटीच्या निर्णयाला जनहित याचिकेच्या माध्यमातून आव्हान देण्यात आलं आहे. जुलै २०२५ मधील इयत्ता ८ वीच्या पुस्तकाच्या युनिट ३, पृष्ठ ७१ वरील फिगर ३.११ मध्ये इ.स. १७५९ मधील मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविण्यात आला होता. मात्र, राजस्थानमधील माजी राजघराण्यांनी तसेच राजकीय पुढार्यांच्या आक्षेप घेतल्यानंतर मराठा साम्राज्याचा नकाशा गुपचुप वगळण्यात आला असल्याचा आरोप करण्यात येते आहे. नकाशात जैसलमेर संस्थान आणि त्याअनुषंगाने राजस्थानातील काही भाग मराठा साम्राज्याच्या नियंत्रणाखाली दाखवण्यात आल्याने त्याला आक्षेप घेण्यात आला होता. मराठा साम्राज्याचा नकाशा वगळण्याचा निर्णय मनमानी तसेच एकतर्फी आल्याचा याचिकेत दावा करण्यात आला असून हा विषय आता न्यायालयापर्यंत पोहचाल आहे. तसेच हा निर्णय, ऐतिहासिक पुरावे, अभिलेखीय नोंदी किंवा शैक्षणिक अभ्यास न तपासता घेण्यात आल्याचा याचिकेत आरोप करण्यात आला आहे. याचिकेत असे नमूद करण्यात आले आहे की, मराठा साम्राज्याने अठराव्या शतकात भारताच्या मोठ्या भूभागावर अधिपत्य गाजवले होते. मात्र, एनसीईआरटी ने नवीन बदलांमध्ये हा ऐतिहासिक नकाशा वगळून नवीन पिढीला खऱ्या इतिहासापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मराठा साम्राज्य हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून ते अटकेपार पसरलेले राष्ट्रव्यापी साम्राज्य होते. असा नकाशा हटवणे हा छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या वारसांच्या कर्तृत्वाचा, महाराष्ट्रातील व भारतातील आठरापगड जातीचा अपमान असल्याची भावना याचिकेत व्यक्त करण्यात आली आहे.

# पत्नीच्या खूनप्रकरणी ७४ वर्षीय पतीला जन्मठेप

**पुणे । प्रतिनिधी**

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिची कुऱ्हाडीने अत्यंत क्रूरपणे हत्या करत तिचे मुंडके घेऊन रामचंद्र शेहू चव्हाण (वय ७४, रा. गंगा ओशियन पार्क सोसायटीसमोर, भारती विद्यापीठ परिसर) यास पुणे सत्र न्यायालयाने जन्मठेप तसेच, ५ हजार रुपये दंड ठोठावला.

दंड न भरल्यास एक महिना अतिरिक्त कारावासाची शिक्षा देण्यात आली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश सुनील जोशी यांनी हा निकाल दिला. सोनाबाई रामचंद्र चव्हाण (वय ५५) यांची हत्या झालेल्या पत्नीचे नाव आहे.

या प्रकरणात, चव्हाण याला अटक करीत त्याविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील प्रेमकुमार अगरवाल यांनी एकूण २४ साक्षीदार तपासले. यामध्ये आरोपीच्या सुनेची साक्ष महत्त्वाची ठरली. मुख्य प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेल्या तिने डोळ्यांदेखत आपल्या सासूवर झालेला हल्ला पाहिला होता. मयताचे रक्त तिच्या कपड्यांवरही उडाले होते. रस्त्याने जाणाऱ्या एका व्यक्तीने आरोपी कापलेले मुंडके घेऊन जात असतानाचा व्हिडिओ मोबाईलमध्ये रेकॉर्ड केला होता. विशेष म्हणजे, हा साक्षीदार नोकरीनिमित्त जपानमध्ये असतानाही न्यायालयाने त्याची साक्ष नोंदवून घेतली. तसेच, एका ५ वर्षांच्या चिमुरडीनेही 'अण्णा' (आरोपी) ला ओळखले. घटनेनंतर आरोपी एका हातात मुंडके व दुसऱ्या हातात कुऱ्हाड घेऊन चालला होता. त्या वेळी रस्त्यावरून जाणाऱ्या एका महिलेने आरोपीला विचारले की 'अण्णा कुठे बकरू कापले?' त्या वेळी म्हणाला, 'बायकोला मारले.' आरोपीने महिलेला दिलेला कबुलीजबाब सरकारी पक्षाने न्यायालयात सिद्ध केला.

# पुण्यात दुकानदाराकडून १० वर्षांच्या मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात लहान मुलांवरील अत्याचाराच्या घटनांचे सत्र सुरूच असून गुरुवारी (दि. ७) दुधभट्टी परिसरात १० वर्षांच्या मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आला. परिसरातील दुकानदारानेच हे कृत्य केले असून पोलिसांनी दुकानदाराला ताब्यात घेतले आहे. दुधभट्टी गणेश पेठे परिसरात ४७ वर्षीय दुकानदाराने चॉकलेट देण्याच्या आमिषाने मुलीला दुकानात बोलाविले. यानंतर त्याने मुलीसोबत आक्षेपार्ह वर्तन करताच मुलीने आरडाओर करत स्वत: ची सुटका करून घेतली. मुलीने कुटुंबियांना ही घटना सांगताच त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली.


पोलिसांनी दुकानदाराला तत्काळ ताब्यात घेतले असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. गुरुवारी संध्याकाळी साडेचारच्या सुमारास ही घटना घडली असून फरासखाना पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

# म्हाळुंगे-माण टीपी स्कीमला मंजुरी; सरकारच्या निर्णयाने हायटेक सिटी उभारण्याचा मार्ग मोकळा

**पुणे । प्रतिनिधी**

मुळा आणि मुठा नदीची पूररेषा निश्चित करून नव्याने फेररचना केलेल्या आणि पहिली हायटेक सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या म्हाळुंगे-माण नगर रचना योजनेच्या (टीपी स्किम) फेरबदलास नगर विकास विभागाने मान्यता दिली आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हाती घेतलेली ही टीपी स्कीम मागील आठ वर्षांपासून फक्त कागदावरच होती. नगर विकास विभागाच्या मान्यतेमुळे ही योजना अखेर मार्गी लागणार आहे.

पुणे महानगर क्षेत्राचा विकास करण्यासाठी राज्य सरकारकडून पीएमआरडीएची स्थापन करण्यात आली. त्यानंतर पीएमआरडीएने




पहिल्याच टप्प्यात सुमारे २५० हेक्टर वरील म्हाळुंगे-माण टीपी स्कीमचे काम हाती घेतले होते. या हाय टेक सिटीचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते. या स्कीमला सर्व प्रकाराच्या मान्यता मिळाल्या होत्या. तसेच हरकती-सूचनांवर सुनावणी घेऊन भूखंडाचे वाटपही पीएमआरडीएकडून निश्चित करण्यात आले होते. वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे प्रॉपर्टी कार्ड तयार करून रहिवाशांना वाटप करण्याचे नियोजन पीएमआरडीएकडून करण्यात आले होते. परंतु, या टीपी स्कीम करताना मुळा आणि मुठा नदीची पूररेषा दर्शविण्यात आली नव्हती. दरम्यान जलसंपदा विभागाकडून ती निश्चित करून पीएमआरडीएकडे सादर करण्यात आली. परिणामी या दोन्ही नदी काठच्या पूररेषेत बदल झाल्याने काही भूखंडांमध्ये फेरबदल करावा लागल्याने स्कीमची फेररचना करावी लागली.

नगर रचना योजनेच्या क्षेत्रात आणि वाटप करावयाच्या भूखंडामध्येही बदल करावे लागले. नव्याने फेररचना करण्यात आलेली प्रारूप नगर रचना योजना राज्य सरकारकडे पुन्हा मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. त्यास राज्य सरकारकडून मान्यता देण्यात आली. नगर रचना योजनेतील बदलावर पुन्हा सुनावणी घेण्यासाठी लवादाची नेमणूक करण्यात आली. लवादाकडून काम पूर्ण झाल्यानंतर ती अंतिम मान्यतेसाठी जानेवारी २०२४ मध्ये राज्य सरकारकडे पाठविण्यात आली होती. त्यास आता राज्य सरकारकडून मान्यता मिळाल्याने आता या योजनेच्या कामास सुरूवात होणार आहे.

# केवळ बारामतीच नव्हे तर सुनेत्रा पवार २०२९ मध्ये मुख्यमंत्रिपदाच्याही उमेदवार-जय पवार

**बारामती । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्यानंतर रिक्त झालेल्या पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार (डींपर्शीर झुरी) यांनी विक्रमी मतांनी विजय मिळवला. त्यामुळे, सध्यातरी अजित पवारांच्या राजकीय वारसदार सुनेत्रा पवार आहेत. मात्र, बारामतीमधील (इरीरारींळ) मतदानादिवशीच २०२९ च्या निवडणुकीत बारामतीतून कोण? याची चर्चा रंगली होती. रोहित पवार आणि जय पवार (गरळ झुरी) यांनी केलेल्या वक्तव्यामुळे ही चर्चा राजकीय वर्तुळात लक्षवेधी ठरले. तसेच, युगेंद्र पवार यांनीही या चर्चेत सहभाग घेतल्यामुळे बारामतीच्या एक जागेसाठी तीन पवार मैदानात असल्याची चर्चा रंगली. मात्र, आता





जय पवार यांनी पुन्हा एकदा २०२९ च्या निवडणुकीवर भाष्य केलं. विशेष म्हणजे सुनेत्रा पवार २०२९ च्या मुख्यमंत्री म्हणून निवडणूक लढवतील अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.


सुनेत्रा पवार यांनी राजीनामा दिल्याने खासदारकीची जागा रिकामी झाली असून तिथे तुमचे नाव चर्चेत आहे, असा प्रश्न विचारला असता, चर्चा होतेय पण मी इथेच सर्वांसाठी काम करेल, असे म्हणत जय पवार यांनी आपण खासदार म्हणून जाणार नसल्याचे स्पष्ट केले. तसेच, बारामतीत २०२९ च्या विधानसभेच्या निवडणुकांच्या अनुषंगानेही राष्ट्रवादीचे युवा नेते तथा अजित पवारांचे धाकटे चिरंजीव जय पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. काही दिवसांपूर्वी आमची सहकाऱ्यांसोबत चर्चा झाली, सर्वच बारामतीकरांची इच्छा होती की, दादांना एकदा मुख्यमंत्री पाहायचं आहे. आता, वहिनी देखील खूप कष्ट घेत आहेत, मला वाटतं २०२९ ला बारामतीतून विधानसभेला वहिनीच उभा राहतील आणि आमची सर्वांची आशा आहे की, सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री म्हणून ती जागा घ्यायला पाहिजे, असे वक्तव्य जय पवार यांनी केले आहे.

अजित पवार यांनी मुख्यमंत्री व्हावं ही बारामतीकरांसह राज्यातील अनेकांची इच्छा होती, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची इच्छा होती. मात्र, अजित पवारांचे अपघाती निधन झाल्याने ती इच्छा अपूर्ण राहिली. मात्र, आता सुनेत्रा पवार ह्याच मुख्यमंत्री बनून दादांची इच्छा पूर्ण करतील अशी आशा राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि बारामतीकर बाळगत आहेत. त्यातच, आज जय पवार यांनी २०२९ मध्ये सुनेत्रा पवार ह्याच बारामतीच्या उमेदवार असतील हे स्पष्ट केले, मात्र मुख्यमंत्रीपदाच्या उमदेवार म्हणून त्या निवडणूक लढवती अशी आम्हाला आशा असल्याचंही त्यांनी म्हटलं.

# गणेशखिंड रस्त्यावरील वृक्षतोडीला 'ब्रेक'! महापालिका आयुक्त स्वत: घेणार सुनावणी

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका रस्ता रूंदीकरणासाठी गणेखखिंड रस्त्यावरील ५२९ झाडे काढणार आहेत. त्याविरोधात पर्यावरण प्रेमींकडून मानवी साखळी उभारत विरोध केला आहे. त्यानंतर, याची दखल थेट महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतली आहे. या रस्त्यांसाठीच्या वृक्षतोडीवर आलेल्या आक्षेपांची सुनावनी आपण स्वत: घेवून निर्णय घेतला जाईल असा खुलासा राम यांनी केला आहे.तसेच, याबाबतची सुनावणी अथवा कोणताही प्रस्ताव अद्याप आपल्यापर्यंत आलेला नाही. तसेच त्याला मान्यताही दिलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्याच वेळी विकासत्मक नियोजनाची बाजूही सर्वांनी समजून घेतली पाहिजे असे मतही त्यांनी व्यक्त केले.



गणेशखिंड रस्त्यावरील ५२९ झाडे काढण्यात येणार असून त्यासाठी, पालिकेने झाडांना क्रमांक देत त्यावर नोटीसा चिटकविल्या आहेत. त्याला पर्यायप्रेमींनी विरोध केला आहे. तसेच मंगळवारी माजी खासदार वंदना चव्हाण यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना नियमांवलींची माहिती नाही, त्यानंतरही वृक्ष कापणीचा घाट घातला जात असल्याचा आरोप केला होता. त्यावर आयुक्त राम यांनी रस्त्यावरील वृक्षांच्या बाबतीत नागरिकांच्या तक्रारी असतील तर स्वत: तक्रारींवर सुनावणी घेणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच शहरातील विविध विकास कामांसाठी २ हजार ५०० वृक्ष कापल्याच्या तक्रारी पर्यावरणवाद्यांनी केल्या आहेत. केवळ नदी सुधार प्रकल्पासाठी नव्हे तर पुणे मेट्रोची कामे, रस्ता रुंदीकरण आदी विकास कामांसाठी वृक्ष तोड करण्यात आलेली आहे. मात्र इतक्या प्रमाणात वृक्ष तोड केली आहे का याची तपासणी केली जाईल. तसेच नागरिकांच्या तक्रारीवर सुनावणी घेवून पुनर्रोपण केले जाईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

# पीएमपीएमएलचे अध्यक्ष महेश आव्हाड यांच्या वाहनाचा भीषण अपघात; चालक, बॉडीगार्ड गंभीर जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबईहून पुण्याकडे येत असताना पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांच्या वाहनाला मळवली परिसरात भीषण अपघात झाला. या अपघातात वाहनचालक आणि बॉडीगार्ड गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने महेश आव्हाड यांना किरकोळ दुखापत झाली असून ते थोडक्यात बचावले आहेत.

अपघातानंतर बोलताना महेश आव्हाड यांनी सांगितले की, नशीब बलवत्तर



म्हणून आम्ही वाचलो. एका मोबाईल मिनी व्हॅन चालकाने अत्यंत बेशिस्तपणे रस्त्यात अचानक यू-टर्न घेतल्यामुळे आमच्या वाहनाचा भीषण अपघात झाला. या धडकेत वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गाडीचा पुढील भाग पूर्णपणे चुराडा झाल्याची माहिती मिळत आहे. अपघात इतका गंभीर होता की चालक आणि सुरक्षा रक्षकाला तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले महेश आव्हाड यांनीही या अपघातात किरकोळ मार लागल्याचे सांगितले. सध्या त्यांच्यावरही वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुरू आहेत. अपघातानंतर काही काळ परिसरात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. स्थानिक नागरिक आणि पोलिसांच्या मदतीने जखमींना तातडीने उपचारासाठी हलवण्यात आले. दरम्यान, या अपघातामुळे पुन्हा एकदा महामार्गावरील बेशिस्त वाहनचालकांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. अचानक यू-टर्न आणि वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे गंभीर अपघात घडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# भाविकांसाठी आनंदाची बातमी! श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर 'या' तारखेपासून दर्शनासाठी खुले होणार

**पुणे । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर दि. ३१ मे रोजी भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे. मुख्य सभामंडपाच्या पुनर्बांधणीसह विविध सुरक्षा व सुविधा विकासकामे पूर्णत्वाच्या टप्प्यात आहेत. त्यामुळे गेल्या साडेतीन महिन्यापासून बंद असलेल्या मंदिरात भाविकांना आता सुलभ दर्शन घेता येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. भीमाशंकर हे महाराष्ट्रातील प्रमुख ज्योतिर्लिंग असल्याने दरवर्षी लाखो भाविक येथे येत असतात.



तीर्थक्षेत्र विकास आराखड्यानुसार मंदिर परिसरातील गर्दी व्यवस्थापन आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी ही कामे हाती घेण्यात आली होती. जानेवारी महिन्यापासून तीन महिने बंद ठेवण्याचे नियोजन होते, मात्र कामांच्या प्रगतीनुसार ही मुदत ३१ मेपर्यंत वाढवण्यात आली. नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या वाढत्या संख्येला अनुरूप सुविधा उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश होता.यामध्ये भव्य नवीन सभामंडप उभारणी, जुन्या सभामंडपाचे पूर्ण काढणे, पायरी मार्ग, प्रवेश-निर्गमन मार्गांची सुधारण, गर्दी नियंत्रण व्यवस्था, विश्रांती क्षेत्रे इत्यादींचा समावेश आहे. सभामंडपाचे काम पारंपरिक तंत्रज्ञान वापरून वेगाने पूर्ण करण्यात आले असून, सध्या ९० टक्के काम पूर्ण झाले असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# पुणे जिल्हा परिषद शाळांमध्ये आता दहावीपर्यंत शिक्षण

**पुणे । प्रतिनिधी**

शहरालगतच्या गावांमध्ये वाढती लोकसंख्या, औद्योगिक वसाहतींमुळे स्थलांतरित कामगारांची वाढती संख्या आणि उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना दूरवर जावे लागण्याच्या अडचणी लक्षात घेऊन जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पाचवीपर्यंत मर्यादित असलेल्या शाळा आता आठवीपर्यंत सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली असून, ज्या शाळांमध्ये आधीच आठवीपर्यंत वर्ग आहेत, त्या ठिकाणी दहावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण व क्रीडा समितीची बैठक उपाध्यक्ष आणि सभापती विवेक वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत शहरालगतच्या गावांमधील तसेच औद्योगिक परिसरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक स्तर वाढविण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. सध्या जिल्हा परिषदेच्या ३ हजार ५२१ शाळांमध्ये सुमारे २ लाख ३८ हजार ९२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



यापैकी ३४५ शाळा पाचवीपर्यंत असून, ११० शाळांमध्ये आठवीपर्यंत शिक्षण उपलब्ध आहे. आता पाचवीपर्यंतच्या शाळांमध्ये आठवीपर्यंत वर्ग सुरू करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी गावाबाहेर जाण्याची गरज कमी होणार असून, शाळा सोडण्याचे प्रमाणही घटण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


दरम्यान, पुणे जिल्ह्यातील सुमारे १००० शाळांपैकी ३०३ शाळांचे 'मॉडेल स्कूल'मध्ये रूपांतर करण्यात येत आहे, तर उर्वरित ६०६ शाळांसाठीही असेच नियोजन सुरू आहे. बैठकीत मॉडेल शाळांचा आढावा घेण्यात आला तसेच शिक्षकांच्या पदोन्नती, रिक्त पदे भरणे आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासंदर्भात चर्चा झाली. याशिवाय, शासन आणि परीक्षा परिषद आयोजित परीक्षांव्यतिरिक्त इतर कोणत्याही खासगी संस्थांच्या परीक्षा जिल्हा परिषद शाळांमध्ये घेऊ नयेत, असा निर्णयही घेण्यात आला. पाचवीच्या पुढे शिक्षण उपलब्ध झाल्याने विशेषतः मुलींच्या शिक्षणाला चालना मिळेल आणि शिक्षणाचा दर्जा उंचावेल, असे विवेक वळसे पाटील यांनी सांगितले. या निर्णयामुळे ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# महापालिका सुरक्षारक्षक नियुक्त्यांवर राजकीय हस्तक्षेप ?

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या उद्याने, शाळा आणि कार्यालयांच्या सुरक्षेसाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या सुरक्षारक्षकांवरून शहरात नवे राजकारण सुरू झाले आहे. काही नवनियुक्त नगरसेवक आपल्या प्रभागात बाहेरील रक्षक नकोत, आम्ही सुचविलेल्यांनाच कामावर घ्या, असा दबाव प्रशासनावर टाकत असल्याने अधिकाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. यामुळे महापालिकेच्या मालमत्तांची सुरक्षा करायची, की कार्यकर्त्यांचे पुनर्वसन, असा प्रश्न प्रशासनासमोर उभा राहिला आहे.

नियमांनुसार, कंत्राटी संस्थांकडून पुरविलेले सुरक्षारक्षक शहरातील कोणत्याही भागात नियुक्त करता येतात. मात्र, काही लोकप्रतिनिधी आपल्या प्रभागातील शाळा, उद्याने आणि इतर ठिकाणांवर 'आपलीच




माणसे' ठेवण्याचा अट्टहास धरत आहेत.

या मागणीसाठी अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, बदलीच्या धमक्या देणे किंवा कामात अडथळे निर्माण करण्याचे प्रकारही समोर येत आहेत. या हस्तक्षेपामुळे सुरक्षाव्यवस्थेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. सुरक्षारक्षकांना आवश्यक प्रशिक्षण आणि शिस्त महत्त्वाची असते;

मात्र, राजकीय वशिल्याने नियुक्त्या झाल्यास ते कर्तव्यापेक्षा संबंधित नेत्यांचीच सेवा करतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, अनुभवी रक्षक बदलायचे की नियम पाळायचे, याबाबत सुरक्षा विभागातील अधिकारी मोठ्या पेचात सापडले आहेत. नियम मोडल्यास भविष्यात एखादी घटना घडल्यास जबाबदारी कोणाची, हा प्रश्नही निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ठोस भूमिका घेत हस्तक्षेपाला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.